म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १६४२

श्रीशंकर.

# प्रस्तावना.

वाचकहो, मी जें हें पुस्तक लिहिलें आहे तें केवळ कोणत्याही समाजाचा किंवा कोणाही विशेष व्यक्तीचा उपहास करण्याचे उद्देशानें लिहिलेलें नाहीं; तर आजपर्यंतचे माझे आयुष्यक्रमांत भारतवर्षीय अथवा हिंदुस्थानांतील आर्य लोकांत त्यांचे धर्माचार-विचारांत स्थित्यंतर झालेलें आहे हें मला स्पष्ट दिसत आहे व त्या स्थित्यंतरानें आर्यांचें एकंदर धर्माचार विचारांना किती हीन दशा प्राप्त झाली आहे ती पाहून कोणालाही वाईट वाटल्यावांचून रहाणार नाहीं. व तशाच प्रकारची माझेही मनाची स्थिति झाल्यामुळे आर्य लोकांना हल्लींची हीनदशा येण्यास काय काय कारणें झालीं व ती स्थिति सुधारण्याला प्रस्तुत प्रत्येक आर्य ह्मणविणाऱ्यांनीं काय केलें पाहिजे यासंबंधीं दोन शब्द जसे येतील तसे आपलेपुढें लिहावे असा हेतु धरूनच हें पुस्तक लिहिलें आहे. हें पुस्तक लिहिण्याचा मुख्य हेतु हाच कीं हल्लींची आपली स्थिति कशा प्रकारची [illegible] अज्ञानी अशा लोकांना कळावी व हें पुस्तक वा[illegible] सुधारण्याचे मार्गाला लागावें. मोठमोठीं सं[illegible] ग्रंथांतील वचनें देऊन पुस्तक सजवून लोकांना झुलविण्याच्या हेतूनें हें पुस्तक लिहिलेलें नाहीं. 'घेतो हंस जसा पयोन्वित जलांपासून एकट्या दुधा' या वचनाप्रमाणें राजहंस जसा जलमिश्रित दुधांतून फक्त दुध तेवढेंच घेतो, त्याप्रमाणें वाचकवर्गानेंही यांतील वर्णाश्रमधर्म हा विषय तेवढा ग्रहण करावा. व भाषारचना व विषयरचना वगैरेचे बद्दल जे कांहीं दोष असतील त्यांजबद्दल क्षमा करावी—कारण मी पंडित नाहीं—एवढीच विनंति आहे.

पुस्तक कर्ता

विनायक भालचंद्र मराठे,

आपला देश, धर्म व राज्य यांचा हितचिंतक

१८२०२

# उपोद्घात.

## हिंदुस्थानचा अभ्युदय केव्हां होणार ?

वर लिहिलेल्या मथाळ्यांतील उद्गार बहुतकरून अलिकडे बऱ्याच वर्तमानपत्रांतून व प्रस्तुत गाजत असलेल्या आमच्या पुढारी ह्मणविणाऱ्या लोकांकडून ' अहोरूपमहोध्वनिः ' या ह्मणीप्रमाणें ऐकण्यांत येतात. परंतु त्यांच्यांत ते उद्गार खरे करून दाखविण्यासंबंधानें त्यांचे समजुतींत सुबयानें प्रवेश केला आहे असें मात्र दिसून येत नाहीं. तेव्हां आतां पूर्वींचे व प्रस्तुतचे स्थितीचे अनुभवावरून आपली हल्लींची स्थिति सुधारण्यास आपले पुढील पिढीस यासंबंधाची काळजीनें दिशा आपण दाखविली पाहिजे. कारण ' पुढल्यास ठेंच व मागील शहाणा ' या ह्मणीप्रमाणें तरी आपण जागें होऊन आपले स्थितीचा विचार केला पाहिजे. तेव्हां आतां प्रथम वरील अग्रलेखाचे उत्तरादाखल मी असें सुचवितों कीं, ज्या वेळीं आपलें जाति—वर्गीकरण पूर्वीचेच पद्धतीनें पुनरपि पूर्णपणें अस्तित्वांत आणण्याबद्दल आपण खटपट कराल तेव्हांच हिंदुस्थानांतील लोकांचा अर्थात् हिंदुस्थानाचा अभ्युदय होईल. नाहींपेक्षां आमचे अलीकडील पुढारी ह्मणविणारे मंडळीचे उपदेशाप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांना वरील स्थिति कधींही प्राप्त होणार नाहीं. करितां प्रस्तुतची परावलंबी स्थिति जाऊन तिचे बदलीं सर्वांस स्वावलंबनाची स्थिति प्राप्त होऊन आपण सुखी व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं, आपण कोण, आपलें जनन कोणते कुळांत झालें आहे व आपणास जगांत कसें वागलें पाहिजे इकडे लक्ष पोंचवून ज्या कुळांत आपलें जनन झालें असेल तेंच कुल आपण श्रेष्ठ मानून त्या कुलाचे आचार विचाराप्रमाणें वागण्यास लागलें पाहिजे; व त्यांत निष्णात होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशा रीतीनें आपण वागलों तरच आपली हल्लींची कष्टप्रद स्थिति जाऊन आपण सुखाचे दिवस पाहूं. व अशा रीतीनें आपला ह्मणजे सर्व हिंदुस्थानाचा भाग्योदय होईल. यास उदाहरण— आपला हात, अर्थात् हाताचा पंजा. यास पांच बोटें आहेत. त्याची आपण आं-

गठा, करांगुली, मधलें बोट व त्याचे बाजूचीं दोन बोटें अशी व्याख्या करतों व हा हात माझा आहे, मला तो ईश्वरानें दिला आहे, माझा हात देणारा ईश्वर आहे, असें आपण मानतों. ज्यानें आपल्याला एवढें सुंदर शरीर दिलें त्यानें त्याच्या अवयवांचे रचनेंत तरी सम–विषमपणा कां ठेवला आहे ? तर अशा सम–विषम रचनेपासूनच मनुष्याचें कार्य होत आहे व ह्मणूनच त्यानें अशी रचना केली असावी. यावरून त्या सर्व-शक्तिमान् परमेश्वराचें दूरदर्शित्व, दयालुत्व व न्यायीपणा दिसून येतो. परमेश्वरानें घालून दिलेल्या याच मार्गानें आमचे समाजांत पूर्वीचे समंजस लोकांनीं जें जातिवर्गीकरण करून ठेवलें आहे, त्याप्रमाणें आह्मीं वागलों तर आमची स्थिति सुधारेल. इतर अन्य मार्गांनीं आह्मी कितीही प्रयत्न केले तरी ते व्यर्थ गेल्याशिवाय कधींही रहाणार नाहींत इतकेंच नव्हे तर आप-णास व आपले पुढील पिढीस दुःखांत पाडण्यास आह्मींच कारणीभुत होऊं यांत संशय नाहीं. सुमारें तीन–चारशें वर्षांपूर्वीं म्लेंच्छांचें प्राबल्य विशेष होतें व त्यामुळें कांहीं वर्षें आह्मांला दुःखेंहीं भोगावीं लागलीं होतीं; परंतु कांहीं कालानंतर शिवावतारी गोब्राह्मण प्रतिपा[illegible] वाजीमहाराजांसारखा पुरुष उत्पन्न होऊन त्यानें आपल[illegible] एसाजीसारख्या अनुयायांचे साह्यानें आह्मांला त्यांचेपासून हात [illegible] त्रासांतून सोडविलें व स्वराज्यस्थापना करून स्वतंत्रता दिली. त्यावेळीं श्रीशिवाजी महाराजांची मंडळी व स्वतः शिवाजी महाराज हे सर्व निरनिराळ्या वर्णाचे होते, परंतु त्या सर्वांचा प्रेमभाव एकच होता. सर्व लोक त्यावेळीं मुसलमानी अमलानें त्रासल्यामुळें त्या त्रासांतून आपण केव्हां सुटूं असें प्रत्येकाला वाटत होतें; त्यावेळीं शिवाजीसारखा पुढारी त्यांना मि-ळाल्यामुळें त्यांचे इष्ट हेतु तडीस गेले. प्रस्तुतची स्थिति बहुतेक अशी तशीच झालेली आहे; परंतु त्यावेळची व हल्लींची स्थिति यांत परिस्थिति भिन्न आहे. तरी या स्थितींतही पुष्कळांना सुख वाटत आहे. परतु आरंभीं सुख तें शेवटीं दुःखाला कारण होतें, हें वाचकांनीं पूर्ण लक्षांत ठेवावें.

चारी वर्णांनीं आपापले धर्माचार–कुलाचार सोडून दिले असून सर्वांनीं फक्त एका परसेवावृत्तीचा अंगिकार केला आहे व अजूनही करीत

आहेत. ही सेवावृत्ती इंग्रजी अमलाचे आरंभीं सुखप्रद वाटली; परंतु तीच आतां इतकी दुःखमय व दुःसह झाली आहे कीं ती सोडणें अत्यंत जरूर आहे. ज्यांना या स्थितीचा खरोखर मनापासून वीट आला आहे, परंतु त्यांचे विपरीत परिस्थितिमुळें त्यांना सेवावृत्ति नाइलाजानें पतकरावी लागत आहे, त्यांना दोष देतां येणार नाहीं. परंतु अशांनीं निदान आपले कुलधर्माचार-विचाराप्रमाणें वागावें व यापासूनच त्यांचें कल्याण होईल. परंतु ज्यांना परमेश्वरकृपेनें सेवावृत्ति करण्याची मुळींच गरज नाहीं, त्यांनीं ती पतकरलेली असल्यास सोडून देऊन आपले वर्णाचार-धर्माप्रमाणें वागण्यास आरंभ करावा व असें वागण्यांतच सर्वांचें कल्याण होऊन भाग्योदय होईल. हल्लींच्या स्थितींत जातिवर्गीकरण कायम ठेवून त्याप्रमाणें प्रत्येकानें वागावें हा मार्ग श्रेयस्कर आहे व हाच विषय या उपद्घातांत मी मुख्यत्वें लिहिला आहे. जाति-वर्गीकरण ह्मणजे ज्या जातीचा जो धंदा असेल त्याप्रमाणें त्यानें वागावें-उदाहरणार्थ—शिंपी, सोनार, लोहार, कुंभार, कोष्टी, इतर हुन्नरकाम करणारे वगैरे जातीचे लोकांनीं ते ते धंदे करावे. व हेच आपले धंदे त्या लोकांनीं कायम ठेवले ह्मणजे अर्थातच प्रत्येकाचें कल्याण होईल व प्रत्येकाला स्वावलंबनाचा धडा लागेल. ही जातिवर्गीकरणाची प्राचीन पद्धत जेव्हां पूर्ण अस्तित्वांत आणूं तेव्हांच आपला अर्थात् हिंदुस्थानचा भाग्योदय होईल. ह्याच जातिवर्गीकरणाला अर्थात् (Caste system) कास्ट सिस्टिमला सर्व सुधारलल्या राष्ट्रांत श्रेष्ठ स्थान दिलें आहे.

'कां सांडिसी क्रियाकर्म । कां सांडिसी कुळींचा धर्म'

ही तुकारामाची उक्ती या वेळीं प्रत्येकानें स्मरणांत ठेवावी अशी सुचना आहे.

## देश.

' भूमिदेहप्रभेदेन देशमाहुरिह द्विधा । '

वैद्यवर्य वाग्भटाचार्यांनीं वरीलप्रमाणें देशाचे दोन भाग केले आहेत. एक भुमि व एक देह. त्यांत भूमिदेश यासंबंधानेंच प्रस्तुत विचार कर्तव्य आहे भुमिदेश ह्मणजे पृथिव्यादि पंचतत्वांनीं युक्त जो देश तो. अशा

या देशाचे प्राचीन सूज्ञ लोकांनीं अनेक विभाग केले आहेत. व त्यांतच आज मुख्यत्वेंकरून ज्या देशाबद्दल व त्यांतील लोकांबद्दल लिहावयाचें आहे तो हिंदुस्थान देश होय. या हिंदुस्थानाला फार प्राचीन काळीं आर्यावर्त, भारतवर्ष अशीं नांवें होतीं व त्या काळीं तो वरील नांवानेंच ओळखला जात असे. मुसलमान वगैरे लोक या देशांत येऊन त्यांनींच या आर्यवर्ताला—भारतवर्षाला हिंदुस्थान असें नांव दिलें असावें असें वाटतें. सिंधुनद व हिमालय यांचे आंतीलचा हा प्रदेश असल्यामुळेंच त्याला त्यांनीं वरील नांव दिलेलें आहे. व त्यांतील रहाणारे एकंदर लोकांना हिंदु असें ह्मणण्याचा रिवाज पडला आहे. या अजूनपर्यंत चालत आलेल्या हिंदुस्थान व हिंदुलोक या व्यावहारिक शब्दांचाच सदर पुस्तकांत उपयोग केला आहे व त्यांवरच प्रस्तुत पुस्तकाची रचना केली आहे.

## धर्म.

"धर्माला त्यजिलें ह्मणूनि असलें दुर्दैव जोरावलें"

ईश्वराचे इच्छामात्रेंकरून सृष्टि निर्माण झाली व त्या सृष्टींत चार प्रकारचे जीव उत्पन्न झाले. ते जरायुज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज. जरायुज कोटींत प्राधान्येंकरून मनुष्यकोटी श्रेष्ठ मानली आहे व त्याचें कारण मनुष्याला इतर प्राण्यांपेक्षां ज्ञान हें विशेष आहे व या ज्ञानाचे योगानें मनुष्याला सारासार अथवा चांगलें कोणतें व वाईट कोणतें, हें समजतें. ह्या विशेष ज्ञानामुळेंच मनुष्य श्रेष्ठ मानला आहे. या मानवी प्राण्यांत परमेश्वरानें चार वर्ण उत्पन्न केले आहेत ते ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र हे होत. या चारी वर्णांला त्यांचे धर्म, आचार, विचार वगैरे सर्व व्यवस्था सृष्टिकर्त्यानें उत्तम लावून दिली आहे. या चारी वर्णांत ब्राह्मणवर्ण अनादि काळापासून श्रेष्ठ मानला आहे. पूर्वीचें राज्यामध्यें निदान ब्राह्मण वर्गाला आपल्या धर्माप्रमाणें आचरण करतां येत होतें व तशा काळीं जरी कांहीं सेवा करणारे होते तरी ते राजसेवा करीत होते व जे सेवा करणारे नव्हते, त्यांत कोणी शास्त्री, कोणी पुराणिक, कोणी हरदास वगैरे असत व त्यांचा चरितार्थ त्या त्या धंद्यावर लोकाश्रय व

राजाश्रयामुळें चालत असे व त्यामुळें त्या काळीं कोणाला पोटासाठीं हल्लीं-प्रमाणें काळजी करावी लागत नसे. अशा रीतीनें प्रत्येक वर्णाचा वर्ग आपापल्या धर्माप्रमाणें चालत असे. पूर्वीचें राज्य नष्ट झाल्याबरोबर अर्थी-तच स्वधर्माचरणापासूनही लोक पराङ्मुख झाल्यामुळें हल्लींची कंगाल स्थिति प्राप्त झाली आहे. ही स्थिती जाऊन पूर्वीप्रमाणें चांगली स्थिति येण्याला फिरून लोकांनीं स्वधर्माचरणानें वागूं लागलें पाहिजे. व यासं-बंधाचा थोडासा उल्लेख उपोद्घातांत केलेलाच आहे. प्रस्तुत पुस्तक हें अगदीं साधारण मनुष्यांचे करतांच तयार केलें आहे व त्यांचे समजुतीक-रतां धर्म आधीं कीं कर्म आधीं याचा खुलासा या पुस्तकाला जोडलेल्या चित्रपटांतील ७,८,व ९ या चित्रांवरून त्यांना करून द्यायचा विचार आहे.

**"जसें असतें तसें दिसत नाहीं; व जसें दिसतें तसें असत नाहीं."**

७, ८ व ९ या चित्रांचा खुलासा—७, ८,९ हीं तीन बायकांचीं व ९,८,७ हीं पुरुषांचीं चित्रें आहेत. अवयवभेदामुळेंच तीं पुरुष व स्त्री अशीं ओळखलीं जातात. तीन बायकांचे चित्रांत अनुक्रमें आई, सून व मुलगी अशीं नात्याचीं आहेत व पुरुषांचें चित्रांत ९,८,७ ही अनुक्रमें जांवई, मुलगा व बाप अशा नात्याचीं आहेत. ७—९, व ९—७ हीं चित्रें वरून पाहणारास जोडप्यासारखीं ( couple ) दिसणारीं आहेत परंतु तीं तशीं नसून, ७ चें चित्र स्त्रीचें व ७ चें पुरुषाचे हें जोडपें आई—बापाचें आहे; ८ व ८ हें सून—मुलाचें जोडपें आहे. व ९ व ९ हें मुलगी व जांवई यांचे जोडपें आहे. हें असें आपण कां ह्मणतों ? तर एक धर्मामुळें. धर्मामुळें आईबाप, मुलगा—सून, जावई—मुलगी असे संबंध झालेले असतात व हे आपण पाळतों. हें केवळ धर्मामुळें. अशीं जर धर्मबंधनें व त्यामुळें परस्परांत होणारीं नातीं यांची योजना आमचे धर्मानें केलेली नसती, तर सब गोलंकार झाला असता व मनुष्यांत व जनावरांत कांहीं फरक राहिला नसता. तो फरक अजुन धर्मानें व रुढीनें अव्याहत चालू आहे ह्मणुनच मनुष्याला मनुष्य ह्मणायचें. व तो फरक जर मनुष्यानें ठेवला नसता तर त्याला दोन पायांचा पशूच ह्मटलें असतें. तिऱ्हाईत मनुष्याला हे संबंध कांहीं माहित नसतात. परंतु आपण जेव्हां त्याला हा माझा

मुलगा, ही माझी सून, हा माझा जावई, ही माझी मुलगी, असें सांगतों, तेव्हांच त्या तिऱ्हाइताला हे संबंध समजतात. हे जे आपण असे अमुक अमुक संबंध आहेत असें सांगतों तें केवळ एका धर्मामुळेंच. हीं अशीं परस्परधर्मबंधनें लावून दिलेलीं आहेत, ह्मणूनच आपण परस्परांवर प्रेम करतों. ही अशी जर व्यवस्था नसती तर कोणी कोणाला विचारीनासें झालें असतें.

कोणाची मुलगी, कोणाचा मुलगा; दोघांचा जन्म दोन निराळ्या ठिकाणीं; परंतु तोच त्यांच्यांत पुढें विवाहसंबंध झाल्यानंतर तीं एकमेकांवर प्रीति करूं लागतात. व हें प्रेम अकृत्रिम होतें व तें अखेर-पर्यंत कायम असतें. हा विवाहसंबंध होण्याच्या पूर्वी त्याचें एकमेकांवर प्रेम नसतें. हे असे संबंध प्रत्येक जातीतील धर्मात आहेत. मुसलमानी धर्मात विवाहसंबंधाला शादी ह्मणतात व ख्रिश्चनधर्मात Wedding वेडिंग ह्मणतात.

हा दांपत्यसंबंध झाल्यावर आपण तिला आपली बायको असें ह्मणतों व तिच्या पोटीं जी संतति होते तिच्या विषयीं आपण जी काळजी घेतो ती केवळ या धर्मबंधामुळेंच. परंतु अशीच संतति जर तिऱ्हाईत मनुष्याची असली तर तीसंबंधानें आपण मुळींच काळजी घेत नाहीं. याचें कारण उघडच आहे कीं तितका प्रत्यक्ष संबंध नसतो. व यामुळेंच हें माझें व तें दुसऱ्याचें असें आपण नेहमीं ह्मणतों. हेंही केवळ एका धर्मामुळेंच. ही परस्परांची ओळख मनुष्य प्राण्यांत आहे तीही केवळ धर्मामुळेंच. ही ओळख जनावरांत नाहीं व त्यामुळेंच त्यांच्यांत सज्ञानाचा अभाव आहे. पक्ष्यांमध्यें नर व मादी असें जोडपें जन्मतःच उत्पन्न होतें व त्या दोहोंपैकीं कोणीही एक मरण पावलें तर दुसरें तसेंच जन्मभर एकटें रहातें. परंतु दुसऱ्या मादीशीं किंवा नराशीं कधींही संबंध करीत नाहीं व हा परमेश्वरानें लावून दिलेला धर्मसंबंध ती अज्ञान पक्षिजातही जन्मभर पाळते. मग मनुष्य जातीनें—इतकेंच नव्हे तर श्रेष्ठ वर्ण ब्राह्मणांनीं—तो धर्म पाळला तर त्यांत आश्चर्य नाहीं. अशा संबंधामुळें प्रेमभाव उत्पन्न होतो व यामुळेंच आपण माझ्या

मुलाकरतां अमुक व्यवस्था केली पाहिजे, मुलीकरतां व बायकोकरतां व भावाकरतां अमुक व्यवस्था केली पाहिजे असें ह्मणतों व त्याप्रमाणें आपण करतोंही. तसेंच बाप मयत झाला असतां त्याची ( बापाची ) इस्टेट आपणाला मिळावी ह्मणून मुलगा नानातऱ्हेची खटपट करतो व इस्टेटीचा खरा व योग्य वारस मी आहे असें खात्रीपूर्वक सिद्ध करून देतो. इतरांस ते हक्क मिळूं देत नाहीं. तें कशामुळें? तर एका धर्मामुळें. तसेंच पितृधर्मामुळें बाप मुलावर हक्क सांगतो, नवरा स्त्रीवर सांगतो, हें कशामुळें ? तर फक्त धर्मामुळें. हीं धर्मतत्वें सर्व वर्णांत व जातींत एकच आहेत. संसारांत व स्वतःचे फायद्याकरतां ह्मणून जर आपण प्रत्येक गोष्टींत धर्माची व रूढीची बाब पुढें ढकलतों, तर इतर कपिलतीर्थासारख्या बाबतींतहीं आपण तसें वागलें पाहिजे. हीं तत्वें जर सर्व बाबतींत सारखीं लागूं करायचीं नाहींत, तर बापाची किंवा चुलत्याची किंवा इतर लांबच्या नातेवाइकाची इस्टेट मिळवण्याकरतां तरी धर्मसंबंध लावून आपली स्वतःची मालकी कां सिद्ध करावी ? मुळींच करूं नये. स्वतःचे फायद्याचे वेळीं धर्मशास्त्र पुढें करायचें व इतर प्रसंगीं धर्माचें काय आहे ? असें ह्मणायचें, हें करणें मनुष्यपणाला उचित नाहीं. तर सर्व बाबतींत—मग फायदा असो अगर तोटा असो—धर्मशास्त्राप्रमाणेंच वागणें हें न्याय व धर्मशास्त्रास उचित आहे. हें धर्माचरण अलीकडे सुटल्यामुळेंच असा आमचेवर दुर्धर प्रसंग येऊन ठेपला आहे. धर्माची महति एका आधुनिक कवीनें पुढीलप्रमाणें वर्णिली आहे ती वरून वाचकांस याची महति कळेल.

**" सौख्याचा जनिता सुकीर्ति करितां पाता महा ताप हा; आहे धर्मच एक कास धरितां त्याची नरा ! वा ! पहा ॥ लोभे अष्टहि सिद्धि लागतिल त्या पायीं तुह्मीं सर्वदा; सेवी यास्तव आर्यधर्म अपुला ईशा भजे सर्वदा ॥ १ ॥ "**

## ब्राह्मण.

**" वर्णानां ब्राह्मणो गुरुः "**

चार वर्णांत ब्राह्मण वर्ण हा श्रेष्ठ आहे असें वरील चरणाचें तात्पर्य आहे. प्रत्येक वर्णाला धर्मबंधनें आहेत व त्याप्रमाणें तो वागला तरच

त्याला सुख होतें. प्रस्तुत सर्व वर्णांचें आचरण त्यांचे धर्माविरुद्ध होत आहे व त्यामुळेंच हल्लींची ही वाईट स्थिति आली आहे. सर्व वर्णांबरोबर ब्राह्मण वर्णानेंही आपलें आचरण सोडलें आहे. या श्रेष्ठ ह्मणवणाऱ्या वर्णाकडे सर्व वर्णांचें गुरुस्थान असून त्यानेंही आपलें धर्माचरण सोडावें हें त्याला अनुचित आहे व यामुळें त्याचे श्रेष्ठपणालाही कमीपणा येत आहे. श्रेष्ठपणाचे मानाबरोबर कनिष्ठपणाचा मानही त्यानें आतां घेतला आहे व त्यामुळें इतर वर्णांचे लोक ब्राह्मण वर्णाचा तिरस्कार करीत आहेत. परंतु हें त्या वर्णांचे करणेंही गैर आहे. कारण त्यांनींही आपला धर्म सोडला तेव्हां त्यांनीं दुसऱ्याला दोष देणें बरोबर नाहीं. ब्राह्मण वर्णानें आपला सर्व वर्णांवरील श्रेष्ठपणा पूर्ववत् कायम ठेवण्यासाठीं प्रस्तुत वेळीं प्रयत्न करणें जरूर आहे. व ब्राह्मण वर्ण आपले धर्मानें वागूं लागला ह्मणजे इतर वर्णांनाही त्यांचे धर्माप्रमाणें वागण्याला लावण्यास त्याला अधिकार येईल व त्याचे सांगण्याप्रमाणें ते वागूं लागतील. चारी वर्णांचें धर्माचार काय आहेत, त्याप्रमाणें त्यांचें पूर्वीं वर्तन कसें होतें, व हल्लीं कसें आहे व हल्लींच्या वर्तनावरून सर्व वर्णांची किती हीन स्थिति झाली आहे व तींतून सुटून पूर्ववत् सुखी होण्याला धर्माचरणानेंच वागणें जरूर आहे ह्याबद्दल येथें विचार करणें आहे. तूर्त ब्राह्मण वर्णासंबंधानेंच येथें विचार कर्तव्य आहे. व त्यानंतर बाकीचे तीन वर्णांसंबंधानें विचार करूं.

परमेश्वराचे विराट स्वरूपाचें वर्णन वेदांत आहे त्यांत ब्राह्मणाला मुखाची, क्षत्रियाला बाहूची, वैश्याला मांड्यां ( ऊरू ) ची व शूद्राला पायाची उपमा दिलेली आहे. ज्या अर्थीं परमेश्वराचे मुखापासून ब्राह्मणवर्ण उत्पन्न झाला आहे त्या अर्थीं तो श्रेष्ठ होय व "सर्वेषु गात्रेषु शिरः प्रधानं" या प्रमाणें शरिराचे सर्व अवयवांत शिर हें प्रधान मानलें आहे. या न्यायानें प्रथम ब्राह्मणवर्गानें आपले आचारविचार पाळण्याला लागलें पाहिजे. वेदामध्यें ब्राह्मण जातीनें जीं कर्मे आचारावयाचीं तीं पुढीलप्रमाणें सांगितलीं आहेत. १ अध्ययन ( शिकणें ) २ अध्यापन ( शिकवणें ), ३ दान ( देणें ), ४ प्रतिग्रह ( घेणें ), ५ यजन ( यज्ञ करणें ) व ६

याजन ( यज्ञ करवणें ). या कर्मीप्रमाणें ब्राह्मण वर्णाचें आचरण इ० सन ११०० पर्यंत चांगलें चाललें होतें. त्यावेळीं ब्राह्मणांमध्यें भिक्षुक व गृहस्थ हे भेद झालेले नव्हते. ते भेद इ० सन ११०० नंतर झाले. असे वर्ग जरी ब्राह्मणांत झाले होते, तरी त्यांचें आचरण उत्तम प्रकारचें होतें. ह्मणजे एका प्रतिग्रहाशिवाय त्यावेळचे गृहस्थ ब्राह्मणाचीं सर्व कर्में करीत असत. परंतु पुढें १९ वे शतकाचे सुरुवातीपासून पूर्वींचा गृहस्थ-वर्ग नामशेष होण्याला कारण त्यावेळचा भिक्षुक वर्गच होय. व १९ व्या शतकाच्या मध्यकालानंतर जी रावसाहेब रावबहादुरासारखी विद्वानांत गणलेली मंडळी उत्पन्न झाली व जी पुढें ब्राह्मणसमाजाची सुधारणा करणारी अध्वर्यु ह्मणून पुढें आली ती बहुतेक भिक्षुक घरांण्यांतीलच होती. याच वेळेपासून पूर्वींचा गृहस्थ वर्ग नामशेष झाला व जो तो मी गृहस्थ आहे असें आपणाला ह्मणवुन घेऊं लागला. याच पिढीपासून खऱ्या ब्राह्मणाचें आचेरण सुटण्यास आरंभ झाला.

परंतु गृहस्थ झाला तरी त्यानें अध्ययन, दान व यजन हीं ब्राह्मणाचीं कर्में करूं नयेत असें कोठेंही सांगितलेलें नाहीं. तर त्यानें हीं कर्में अवश्य केलींच पाहिजेत. अर्थात् हा गृहस्थ ब्राह्मणाच्या विहित कर्मापासुन दूर राहूं लागला व या मुळेंच त्यांना हीन स्थिति प्राप्त झाली आहे. ब्राह्मण वर्णांत कांहीं भिक्षुकवर्ग आपले आचरणाप्रमाणें वागत आहे ह्मणजे त्यांच्यांत वेदाध्ययन, पंचमहायज्ञ, अग्निहोत्र, वगैरे कर्में-अजून अल्प प्रमाणांत कां होईना—चालत आहेत ह्मणुनच ब्राह्मण जाति अस्तित्वांत आहे व याचें कांहीं अंशीं श्रेय त्या पूर्वींचे खरे भिक्षुक वर्गालाच आहे. या भिक्षुक वर्गांत नेहमीं पंचमहायज्ञ करणारेही आहेत. पूर्वींची ब्राह्मणाची विद्या ह्मणजे वेद व शास्त्रविद्या हीं होय. चार वेद, सहा शास्त्रे, न्याय, व्याकरण वगैरे विद्या पूर्वींचे ब्राह्मण शिकत असत व ही विद्या ते जोंपर्यंत शिकत होते तोंपर्यंत त्यांच्यांत कोणीही पोटासाठीं उपाशी मेलेला ऐकिवांत नाहीं व अजूनही जे वेदविद्या शिकत आहेत, त्यांनाही पोटासाठीं कोणाकडे तोंड वेंगाडण्याचा प्रसंग आलेला नाहीं. ह्मणजे वेदविद्या शिकलेला मनुष्य उपाशी मेला असें कोठेंही अजून ऐकण्यांत नाहीं. याचें कारण उघडच

आहे कीं ते वेदमार्गानें आचरण करीत आहेत. व त्यामुळें त्यांना कोण-तेही प्रकारची काळजी नाहीं,याचे उलट अलीकडील विद्येनें स्थिति झालेली आहे. ती अलीकडील विद्या ह्मणजे इंग्रजी शिकणें ही होय. मुलगा मराठी तीन चार यत्ता शिकला कीं त्याला एकदम इंग्रजी शाळेंत घालतात व तो सातव्या यत्तेची परिक्षा पास झाल्यावर पुढें नोकरीचे मार्गाला लागतो व कांहीं साधनांनीं तो बी. ए., एम्. ए. व एलेल. बी. परिक्षा पास होतो. परंतु त्याला लहानपणापासून घरीं धार्मिक असें कांहींच शिक्षण मिळत नाहीं, एवढेंच नव्हे तर मुंज झाल्यावर त्याला संध्याही पुरती येत नाहीं. तर ब्राह्मणाच्या नित्यनैमित्तीक कर्मापैकीं पुरुषसूक्त, देवपूजा, वैश्वदेव, सौर वगैरेचें शिक्षण कोठून मिळणार?व हेंच शिक्षण जर मूळापासून नाहीं, तर त्याचे धार्मिक आचार विचार चांगले कोठुन रहाणार? मुंज झाल्यावर मुलाला घरीं जर नित्यनैमित्तिक कर्मांचें शिक्षण दिलें, तर त्यांत आचारही चांगला राहतो. वाटल्यास इंग्रजी शिक्षण द्यावें. परंतु तेंही बेतापुरतें. अलीकडील कांहीं गृहस्थ ह्मणवण्याऱ्या मंडळीचा असा एक आक्षेप नेहमीं पुढें येतो कीं, कायहो, तुह्मी ह्मणतां कीं आह्मीं स्नानसंध्या वगैरे कर्मे करावीं व नोकरी करूं नये. तर आमचा चरितार्थ चालावा कसा ? हें ह्मणणें वरवर ऐकणारास खरें-ही वाटण्याचा संभव आहे. परंतु यावर माझें असें ह्मणणें आहे कीं संध्या वगैरे ब्राह्मणाचीं कर्में तुह्मी केलीं नाहींत व नुसतें इंग्रजी शिकलां, एवढेंच नाहीं, तर बी. ए. एलेल. बी. वगैरे परिक्षा पास झालां, तरी तुह्मांला नोकरी मिळते आहे कां ? आज असे किती लोक तुमचे पहाण्यांत येतील कीं जे स्कूल फायनल, पब्लिक सर्व्हिस वगैरे नोकरीकरतां ठेवलेल्या परिक्षा पास झालेले आहेत; परंतु त्यांपैकीं किती लोकांना नोकऱ्या मिळालेल्या आहेत ? व किती लोक परिक्षा पास असूनही त्यांना नोकऱ्या मिळत नाहींत ? हीच स्थिति बी. ए., एम. ए. वगैरे पदवीधरांची झालेली आहे. अशी स्थिति जर इंग्रजी शिकले-ल्या लोकांची आहे व एवढें इंग्रजी शिकण्याचे श्रम मोठे पगाराचे नोकरी-साठीं केले; परंतु मोठी तर नाहींच परंतु लहानही मिळण्याची हल्लीं पंचाईत पडत आहे. तर त्या शिक्षणापासून काय फायदा ? घड त्या

याच सुमारास भिक्षुक वर्गातील कांहीं मंडळीला आपले मुलांना राष्ट्रीय शिक्षण देऊन त्या द्वारें गृहस्थ बनविण्याची इच्छा होऊं लागली. यानंतर ह्मणजे सन १८४० सालानंतर जी कांहीं मंडळी विश्वविद्यालयाचें शिक्षण घेऊन समाजांत झळकुं लागलीं तीं बहुतेक भिक्षुक वर्गाचीच पिढी होय. प्राथमिक शिक्षण मुलांना मिळाल्यानंतर त्यांना संस्कृत येण्यासाठीं प्रथम अमरकोश, अष्टाध्यायी, रूपावळी, समासचक्र हीं शिकवीत असत. व पुढें मुलांना नीति व धर्म यांचें शिक्षण मिळण्यासाठीं चाणाक्यनीति, विदुरनीति अशीं संस्कृत पुस्तकें शिकवीत असत. यामुळें त्यांना नीति व धर्म यांचा धडा मिळत असे. व यामुळें तीं सदाचारी, सुस्वभावी व सद्गुणसंपन्न अशीं निपजत असत. अर्थात् त्यांची मानसिक वृत्ति दुराचरणाकडे मुळींच वळत नसे व यामुळें तीं सहजगत्या शरीरानें सुदृढ असत. परंतु अलीकडे ही पद्धत जाऊन तिचें बदली मुलांना प्रथम इंग्रजी शिकवण्यास सुरुवात करतात. व संस्कृत शिक्षणाचा पहिला ओनामा इंग्रजी चौथ्या यत्तेंत भांडारकराचें पुस्तकापासुन होतो. पुढें मुलें कॉलेजमध्यें गेल्यावर तेथें जीं संस्कृत पुस्तकें लावतात तीं शृंगारीक नाटकांचीं पुस्तकें होत. इंग्रजी कॉलेजे ज्या वेळेला सुरूं झालीं त्या वेळीं तर अशीं शृंगारिक नाटकांचीं पुस्तकेंच नुसतीं शिकवीत असत एवढेंच नाहीं, तर विद्यार्थी वर्गाकडून तीं नाटकें प्रत्यक्ष रंगभूमिवर करावित असत. केव्हां केव्हां विद्यालयांतही करवीत असत. अशीं प्रयोगाचे रूपानें संस्कृत नाटकें करविण्याचा हेतु काय? तर ह्मणे संस्कृत भाषा अशा संस्कृत नाटक प्रयोगांनीं प्रचारांत येईल. परंतु हीं प्रयोगाचीं नाटकें शाकुंतलासारखीं शृंगारिक असल्यामुळें त्यांचा परिणाम शिष्यवर्गाची नीति बिघडवण्याला कारण होत असतो. यामुळें त्यांच्या मनोवृत्तीवर शृंगाराचा पगडा बसून त्या फार क्षुब्ध होतात, व त्यांची निंद्य आचरणापर्यंत मजल येते. व त्याचा शरीरशक्तीवर फार वाईट परिणाम होतो. याचीं उदाहरणें त्या त्या वेळीं पुष्कळ घडून आलीं आहेत ही अशी स्थिति येण्याला कारण आमचे त्या वेळचे पुढारीच होत. शिष्याचे कोंवळ्या मनाला सदाचरण शिकविण्यास या गुरूजींना त्या वेळीं शृंगारिक पुस्तकांशिवाय दुसरीं पुस्तकेंच नव्हतीं असें ह्मणणें चुकीचें होईल. परंतु त्या वेळचे शिक्षकांना शृंगाराचीच विशेष आवड

होती हें ह्मणणें सयुक्तिक दिसेल असें मला वाटतें. अलीकडे कांहीं इंग्रजी शाळांतून धर्मविषय ह्मणून मुलांना गीता शिकविण्यांत येत असते. परंतु यापासून मुलांची धर्मबुद्धि वाढेल असें वाटत नाहीं. कारण गीता ही अध्यात्मिक अर्थात् पारलौकिक सुखाकरतां आहे. हा अध्यात्मिक विषय मुलांची बुद्धि विकासित झाल्याशिवाय त्यांना समजणार नाहीं. ब्रह्मचर्य व गृहस्थाश्रम ह्या आश्रमांचा अनुभव घेतल्यावर मग वानप्रस्थ आश्रम सांगितलेला आहे. त्या आश्रमांत गीतेसारख्या अध्यात्मिक विषयांची गोडी आपोआपच लागेल. व त्यावेळीं तो विषय समजून घेण्याची पात्रता अंगीं येईल. परंतु पूर्व वयांत गीतेसारखा विषय शिकवण्यानें कांहीं एक फायदा व्हायचा नाहीं. उलट त्यापासून व्यर्थ कालाचा व्यय होऊन तो त्यांचे ऐहिक सुखालाही मुकेल. व त्याबरोबर पारमार्थिक सुखालाही मुकेल. तेव्हां मुलांची धर्मबुद्धि वाढण्यासाठीं त्यांना धार्मिक व नीतिपर अशीं पुस्तकें शिकवावीं ह्मणजे त्यांपासून त्यांचीं मनें शुद्ध होतील व ते कर्मेंही चांगलीं करूं लागतील.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकालानंतर विश्वविद्यालयाचे शिक्षणानें जी मंडळी विद्वान् व पुढारी ह्मणून आमचे समाजांत झळकूं लागली तिच्या मुळेंच अलीकडील पिढी धर्म, नीति व खरी विद्या ह्यांपासून पराङ्मुख झाली व या मंडळीमुळें हिंदुस्थानांतील देशाभिमान व धर्माभिमान नामशेष झाला असें पूर्वी लिहिलें आहे अशा विद्वान् व पुढारी मंडळींचें गुरुस्थानी असलेलें के. महादेव गोविंद रानडे यांचे संबंधानें वांईचे धर्म साप्ताहिकांत ( ता. ६–७–१९०५ ) पुढील प्रमाणें मजकूर आलेला आहे, त्याचा उतारा या ठिकाणीं दिला असतां गैर होणार नाहीं.

" महादेव गोविंद रानडे परस्त्री, मद्यपान, मांसभक्षण इत्यादिकांपासून अगदीं अलिप्त होते, व त्यांचे ठिकाणीं इंग्रजी ज्ञान पुष्कळ होतें, वर्तन साधें असे, इत्यादि गोष्टी आह्मांला कबुल आहेत. परंतु ह्यांनीं जन्मास येऊन केलें काय ? व्यासादि महर्षि, इंद्रादि देवता आणि प्राचीन विद्वान् लोक ह्यांचा ह्यांनीं शक्य तितका उपहास करून समाजामध्यें अनादर उत्पन्न केला. व्यासभट ह्मणून जगदुद्धारक महर्षींचा उप

ह्रास करणाऱ्या लोकहितवादींना माधवरावांनीं वडील ह्मणून पूज्य मानलें. वेदांबद्दल व वेदशास्त्रांबद्दल पुढील पिढीमध्यें रानडेप्रभृतींनींच अनादर उत्पन्न केला. अत्यंत पवित्र व अत्यंत श्रेष्ठ गणल्या जाणाऱ्या महर्षींनीं व संन्याशांनीं मांसभक्षणांत व खादाडपणांत इतकी कांहीं कमाल करून सोडली कीं, प्राणिकोटीतील व वनस्पतिकोटीतील त्यांनीं सर्व जाति गट्ट करून टाकिल्या असें विधान गंभीर स्वरानें व गंभीर मुद्रेनें भर सभेमध्यें आयुष्याच्या शेवटल्या दिवसांतही राव बहादुर रानड्यांनीं केलेलें आहे. पंडिता रमाबाईचें स्तोम माजवून तिच्याकडून शारदासदन स्थापन करण्यांत मुख्य राव बहादुर रानडे हेच होत शारदासदन ह्मणजे ब्राह्मणादि लोकांच्या विधवा मुली व सुना बाटवून त्यांना नाहीं नाहीं तसले ढंग शिकाविण्याचा कारखाना होय ही गोष्ट प्रसिद्ध आहे. व ह्या कारखान्याचे सूत्रधार राव बहादुर रानडे आहेत. संहिता ग्रंथाशिवाय इतर ग्रंथ वेद नव्हेत; वेद ब्राह्मणांपासून तों चांडाळापर्यंत कोणीही शिकावे; पुराणग्रंथ व इतिहासग्रंथ सब झूट आहेत; असें प्रतिपादन करणाऱ्या दयानंदापुढें आरती ओंवाळणारे रावबहादुर रानडेप्रभृतीच लोक. प्रार्थना समाजाचें बंड उपस्थित करून स्नानसंध्या, देवपूजा, सोंवळें ओवळें, इत्यादिकांसंबंधानें पुढील पिढीमध्यें अनादर व तिरस्कार उत्पन्न करणारे हेच होत. ब्राह्मणांतही विधवाविवाह सशास्त्र आहे ह्मणून सर्व दक्षिण हिंदुस्थानांत धुमाकुळ माजवून व स्वत अलग राहून विवाह संस्कारासंबंधानें पुढील पिढीमध्यें अनादर व तिरस्कार उत्पन्न करणारे रावबहादुर रानडे प्रभृतीच. सोशल कॉन्फरन्स प्रतिवर्षी भरवून धार्मिक बाबींसंबंधानें पुढील प्रजेच्या मनांत अनादर उत्पन्न करणारे राव बहादुर रानडेप्रभृतीच. रानडे स्वतः मद्यपान करीत असल्याबद्दल बोभाटा नाहीं, परंतु ह्यांच्या इष्टमित्राचे मुलांनीं केलेल्या मद्यपानाबद्दल वडिलांना दुकानदारांशीं हमेबंदी करण्याची पाळी आली तरीसुद्धां रानड्यांनीं मद्यपी लोकांचा तिरस्कार केला नाहीं.''

मुलांची प्राचीन व अर्वाचीन शिक्षणपद्धति कशी होती व दोहींपासून नफे व तोटे काय आहेत ह्याचें वर थोडेसें दिग्दर्शन केलें आहे. आतां स्त्रियांचे शिक्षणासंबंधानें वरीलप्रमाणेंच थोडासा विचार करूं.

' विनाश्रयेन न शोभंते पंडिता वनिता लता ' या वाक्यावरून पहातां स्त्रियांना स्वतंत्रता देण्याला त्या योग्य नाहींत. अलीकडे सर्वत्र स्वतंत्र या शद्धाचा सुकाळ झाला आहे. व त्याबरोबरच स्त्रीस्वातंत्र्य हाही शद्ध फार प्रचारांत आला आहे. स्त्रियांना अलीकडील शिक्षण देऊन त्यांना पुरुषांप्रमाणें स्वतंत्रतेनें वागूं देण्याबद्दल हिंदुस्थानांत जिकडे तिकडे जारीच्या खटपटी चालल्या आहेत. व त्यासाठीं गेलीं दोन वर्षे सामाजिक परिषदेला जोडून एक स्त्रियांची महिला परिषदही भरविण्यांत येत असते. पुरुषांना धर्म–नीति शिक्षणाचे अभावीं अलीकडील शिक्षण देण्यांत येतें व त्याचे परिणाम किती भयंकर होत आहेत हे सर्व लोकांना व विशेषतः सुधारक लोकांना दिसत आहे. या शिक्षणानें मुलें किती अशक्त होत चाललीं आहेत हेंही उघड दिसतें आहे. तशाच प्रकारचें शिक्षण स्त्रियांना दिल्यामुळें तें किती अहितकारक होत आहे हेंही उघड दिसत आहे. व या शिक्षणामुळें स्त्रियांची सुधारणा न होतां त्या उलट पुरुषापेक्षां वरचढ होत आहेत. त्यामुळें स्त्रियांवर पुरुषांचा दाब नाहींसा झाला आहे. त्याही पुरुषांप्रमाणेंच दुराचारी बनत चालल्या आहेत. साऱ्या पोषाकी झाल्यामुळें कोणालाही शारीरिक मेहनत होईनाशी झाली आहे. ज्या शिक्षणापासून संसाराचीं दोन चाकें जीं स्त्री व पुरुष हीं मोडण्याचे पंथास आलीं आहेत असें शिक्षण निरुपयोगी ठरत नाहीं काय? हें असें दृष्टीसमोर असतांही आमचे समाजांतील विद्वान् धुरीण व अधिकारसंपन्न लोक समाज सुधारण्यासाठीं स्त्रीशिक्षण–व तेंही अलीकडील–अवश्य दिलें पाहिजे असें ह्मणत आहेत. तेव्हां याला काय ह्मणावें?

स्त्री बाल्यावस्थेंत असो, तरुण असो, किंवा वृद्ध असो. घरांतील सुद्धां काम तिनें आपल्या मुखत्यारीनें कांहीं एक करूं नये, असें शास्त्रांत सांगितलें आहे. ह्मणून त्यांना स्वातंत्र्यबुद्धि येण्यापूर्वीच त्यांचा बालपणीं विवाह करणें इष्ट आहे. तेव्हां अलीकडे जें स्त्रीशिक्षणाचें व प्रौढविवाहाचें बंड माजत चाललें आहे, त्याचा परिणाम जर अनिष्ट होऊं लागला तर त्यांत कांहीं नवल नाहीं. स्त्रियांना स्वतंत्रता दिल्याचे परिणाम पुण्यासारख्या शहरवासीयांनाही माहित आहेत. घरांत सर्व प्रकारची अनुकूलता असलेल्या स्त्रियाही स्वैरिणी बनलेल्या प्रसिद्ध

पासून सुखही मिळत नाहीं. ह्मणजे ज्या विद्येपासून स्वार्थही नाहीं व परमार्थही नाहीं ती विद्या शिकून उपयोग काय? कांहीं नाहीं? या विद्येमुळें उलट भीक मागण्याची पाळी आली आहे, परंतु ती भिकही मिळत नाहीं. मिळणार कशी? कारण "याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते." ही अशी स्थिति जर हल्लींच्या शिक्षणापासून व वर्गीकरण सुटल्यामुळें झाली आहे तर हें शिक्षण बंद करणें योग्य नाहीं काय? परंतु याचे उलट जर आपण चाललों ह्मणजे पूर्ववत् वेदविद्या शिकूं लागलों तर आपल्याला उपाशी मरण्याची पाळी येणार नाहीं. कारण ही विद्याच तशी आहे. वेदविद्येचा हेतु पोट भरण्याचा मुळींच नाहीं, तर धर्माचरणाचा आहे. व धर्माचरणानें जो वागतो त्याला आपले योग्यतेप्रमाणें कसलीही ददात पडत नाहीं असा त्या वेदविद्येचा प्रभाव आहे. घटकाभर अशी कल्पना केली कीं आपण वेदविद्या पुष्कळ शिकलों, व उपाशी मरण्याची पाळी ( अशी पाळी कधींही येणार नाहीं ) आली, तरी त्यांत आपलें नुकसान काय आहे? वेद-विद्येपासून स्वधर्माचरण होतें हा काय थोडा फायदा आहे.? ही विद्या मुळीं पोट भरण्याचीच नाहीं, तर स्वधर्माचरणानें वागण्याची आहे. जो स्वधर्माचरणानें वागतो आहे त्याला पोट कसें भरेल ही काळजी करण्याची मुळींच जरूर नाहीं. कारण "धर्मेण हरते व्याधिः". त्याची काळजी पर-मेश्वराला आहे, कारण त्यानें सर्व प्राणिमात्रांचे अन्नपाण्याची व्यवस्था केलेली आहे. अज्ञान अशा यःकश्चित् किडा-मुंगीपासून जर अन्नपाण्याची व्यवस्था परमेश्वरानें केलेली आहे, तर त्यानें मनुष्यप्राण्याचे अन्नपाण्याची व्यवस्था केली असली पाहिजे. एवढा निर्धार ठेवून जर ब्राह्मण आपले धर्माप्रमाणें आचरण करील तर परमेश्वराला त्याची कशाही तऱ्हेनें व्य-वस्था करणें भाग पडेल. पोट कसें भरेल ही त्यानें काळजी करायाला नको व पोट भरण्यासाठीं त्याला इंग्रजी शिकायालाही नको. कारण इंग्रजी शिकुन आतां पोट भरण्याचे दिवस राहिले नाहींत. नोकरीसाठीं ठेवलेल्या परिक्षा पास झालेले व बी. ए., एम्. ए. पर्यंत शिकलेल्या लो-कांनाही माध्यान काळची अडचण पडूं लागली आहे हें सर्वांना दिसतच आहे. अशी अन्नान्न दशा होण्यालाही स्वधर्माचरणाचा अभाव हेंच मुख्य

कारण आहे. या शिक्षणाचे परिणाम ब्राह्मण समाजावर कसे घडले आहेत व नीति व धर्म यांची कशी राखरांगोळी झाली आहे हें पुढें कांहीं पुस्तकांतील व वर्तमानपत्रांतील उतारे देऊन दाखवायचें आहे.

### प्राचीन काळाची शिक्षणाची पद्धत.

सनातन कालापासून ब्राह्मणांची विद्या ह्मटली ह्मणजे वेदविद्या ही होय. ही विद्या शिकण्याकरतां शिष्याला गुरूचे घरीं राहून शिकावें लागत असे. हें शिकणें दोन चार वर्षांत संपत नसे. विद्या शिकण्यासाठीं त्यावेळीं हल्लींप्रमाणें छापलेल्या पोथ्या वगैरे कांहीं साधनें नव्हतीं. कारण त्या वेळीं छापखाने वगैरे नव्हते. ही विद्या शिकण्याची पद्धत ह्मटली ह्मणजे गुरूजींनीं मुखानें सांगायचें व शिष्यानें ते ध्यानांत धरून पाठ करायचें. अशा प्रकारें संथा देण्याचा परिपाठ असे. संथा ह्मणायला उठण्याची वेळ पहाटेची नेमलेली असे. पहाट झाली ह्मणजे गुरूजींनीं स्वतः शिष्यवर्गाला उठवायचें व संथा द्यायची. असा कांहीं काल शिक्षणांत घालवावा लागत असे. हा सर्व काल ब्रह्मचर्य व्रतानें काढावा लागत असे. शिष्यांना गुरूची सेवा फार उत्तम प्रकारची करावी लागत असे. इतका काल वेदाध्ययनांत घालवल्यावर मग शिष्याला घरीं जाण्याची आज्ञा मिळत असे. यावेळीं हल्लींप्रमाणें शिकण्यासाठीं शाळा, विश्वविद्यालयें नव्हतीं. शिक्षकांना पगार वगैरे कांहीं एक द्यावा लागत नसे. शिष्यानें गुरूची मनोभावानें सेवा करायची व गुरूची आज्ञा सर्वथैव मानायची. अशा रीतीनें शिष्य वागला ह्मणजे गुरुदक्षिणा गुरूला मिळाली. हें असें बिनभांडवली शिक्षण होतें. यामुळें शिक्षकही मन लावून शिष्यांना शिकवीत असत. यावेळीं सर्व प्रजा धर्माचरणानें वागत असल्यामुळें फार सुखी होती.

खऱ्या क्षत्रिय राजांचें अस्तित्व कायम होतें तोंपर्यंत हें अशा प्रकारचें शिक्षण अव्याहत चाललें होतें. नंतर वेदाचें शिक्षण कमी कमी होऊं लागलें व त्याबरोबर गुरुमुखानें शिक्षण घेण्याची पद्धतही नाहींशी झाली. कारण यावेळीं छापखाने निघाल्यामुळें वेदांच्या पोथ्या वगैरे मिळूं लागल्या व प्रत्येकजण पोथ्यांवरून वेदाचें अध्ययन करूं लागला. यामुळें गुरूजींची गरज थोडी पडूं लागली.

आहेत, तर वैधव्यादि दुःखामुळें संकटांत पडलेल्या स्त्रियांकरितां शारदा सदनासारख्या निघालेल्या संस्थांचा परिणाम चांगला कसा होणार ?

मद्यपान, दुर्जनसंसर्ग, पतीचा वियोग, हिंडणें, दुसऱ्याच्या घरीं निजणें व दुसऱ्याचें घरीं रहाणें व नाटकाला जाणें हीं दूषणें स्त्रियांना सांगितलीं आहेत. परंतु हल्लीं शिकण्याकरतां शाळेंत जाणाऱ्या स्त्रियांना दुर्जनसंसर्ग नेहमीं होतो. प्रौढ विवाहाच्या चालीमुळें मुलींना समजूं लागल्यामुळें त्या आईबापांचें ऐकेनाशा होतात व मोठेपणीं लग्न होत असल्यामुळें त्यांना तितका काल पतिविरहित काढावा लागतो. तेव्हां हल्लींचें स्त्रियांना मिळत असलेलें शिक्षण त्यांची नीति विघडविणारें आहे व संसारांत त्याचा मुळींच उपयोग होत नाहीं ह्मणून त्या शिक्षणाचा आपण त्याग केला पाहिजे. स्त्रियांना गृहशिक्षण व व्यवहारापुरतें मराठी लिहिणें वाचणें एवढें शिक्षण दिलें ह्मणजे पुरें आहे.

अलीकडील स्त्रीशिक्षणापासून स्त्रियांची नीति व धर्म कसे बिघडतात याचें थोडेंसें दिग्दर्शन केलेंच आहे. तसेंच या शिक्षणापासून स्त्रिया घरांतील साधारण कार्यें करण्याला देखील कशा निरूपयोगी होतात व त्याचा परिणाम त्यांचे प्रापंचिक स्थितिवर ( अगदीं गरीबी असल्यास ) कसा नुकसानकारक होतो, याबद्दल बाईचे धर्म पत्रांत ( ९—२—०९ ) एक लेख आला आहे त्याचा गोषवारा येथें देतो. त्यावरून हल्लींचे शिक्षणापासूनच वाईट परिणाम कळून येतील—"स्त्रीनें सर्वदा आनंदित असावें; गृहकृत्यांविषयीं सर्वदा दक्ष असावें; भांडींकुंडीं वगैरे जें सामान तें तिनें सुव्यवस्थित राखावें; आणि खर्चासंबंधानें हात सैल सोडूं देऊं नये; अशा अर्थाचें एक मनुस्मृतींत वचन आहे. याप्रमाणें सांप्रत स्त्रिया वागत नाहींत आणि सुशिक्षित ह्मणविणाऱ्या तर मुळींच वागत नाहींत. केर पोतेरें, सारवण, वस्त्रें धुणें, भांडीं घांसणें, समया वगैरे स्वच्छ ठेवणें ( अलीकडे समयांचे बदली रॉकेलचे दिवे—कांचेच्या चिमण्या आल्या आहेत, ) स्वयंपाक करणें, पूजेची तयारी करून देणें, शेण वळणें, वस्त्रें-पात्रें जपून ठेवणें, आणि कोणत्याही बाबीसंबंधानें खर्च होतां होईपर्यंत बेतानें होण्याकडे लक्ष देणें. हे जे स्त्रीधर्म अवश्य सांगितले आहेत ते फार महत्वाचे आहेत. याचे विरुद्ध हल्लींची स्थिति झाली आहे ती—बांग-

ज्यांना पूर्वी जितके आणे लागत असत तितके रुपयेही सध्यां पुरेनासे झालेले आहेत. धडवतीकरितां दोन लुगडीं मिळून पूर्वी पांच रुपये पुरत असत. परतु सांप्रत हें मान किमतीनें दुपटीपेक्षांही पुढें गेलें असून बाई-साहेबांना वजनदार लुगडें सोसत नसल्यामुळें दोहोंच्या ऐवजीं वर्षास चार चार लुगडीं लागूं लागलीं आहेत. सारांश, बांगड्या व लुगडीं मिळून सुमारें पंधरा रुपये खर्च मध्यम स्थितीच्या कुटुंबांतील प्रत्येक स्त्रीला जास्त होऊं लागला आहे. स्त्रिया ज्या त्या नाजुक होण्याची सांथच आल्यामुळें भांडीं घांसणें, दळणें, कांडणें, वगैरे बाबतींत मजुरीखर्च प्रत्येक स्त्रीच्या मागें वर्षाचा निदान दहा रुपये वाढलेला आहे. तांदुळ, डाळी वगैरे तयार केलेलीं धान्येंच बाजारांतून आणणें भाग पडत असल्यामुळें कोंडा, फोल वगैरे घरीं राहिनासें झालें आहे. प्रतिवर्षी चार चोळ्या मिळून एक रुपया पुरत असे. परंतु सांप्रत चार रुपयेही पुरेनासे झाले आहेत. ह्मणजे तीन रुपये चोळ्यांकरतां जास्त जाऊं लागले आहेत. दोन वर्षांचीं मुलें होईपर्यंत जुन्या लुगड्यांचीं आंगडीं टोपडीं शिवण्याची चाल बहुतेक नाहींशीं झाल्यामुळें बाजेवर असणाऱ्याही मुलाच्या आंगड्याटोपड्याकरतां बाजार पहावा लागत आहे. गंगावनाचें प्रस्थ फारच माजलेलें आहे धुण्याचा कंटाळा असल्यामुळें ज्या कुटुंबांत वर्षास एक रुपया धोब्याची मजुरी होत असे त्या कुटुंबांत सांप्रत पांच रुपयेही पुरेनासे झाले आहेत. ह्मणजे धोब्याला चार रुपये जास्त जाऊं लागले आहेत. दहा पानें जर घरांत जास्त झालीं तर अन्न शिजविण्याकरतां आचारी मागेल ती मजुरी देऊन आणणें भाग पडत आहे. शिवाय नाटकाचीं पुस्तकें, कादंबऱ्या वगैरे पुस्तकें विकत घेण्याकडेही फाजील खर्च होत आहे. व संगीत नाटकें पहाण्यासाठीं तर कांहींना वर्षाचा फाजील खर्च हौस ह्मणून करावा लागत आहे. तात्पर्य, प्रत्येक कुटुंबांत चैन शिरल्यामुळें वर्षाचा चाळीस पासून पन्नास रुपयांपर्यंतचा खर्च विनाकारण वाढलेला आहे. आणि हा खर्च वाढल्यामुळें कोणत्याही मध्यम स्थितीतील कुटुंबांत शाल-जोड्या, पीतांबर, शेंपन्नास पात्रांचीं भांडीं, जाजम, सतरंजी वगैरे बैठकीचें सामान, समया, मंडपाचें सामान व कंगणी पाटली वगैरे साधारण अलंकार ह्यांचा अभाव झालेला आहे.

ही वर वर्णन केलेली स्थिति हल्लीं प्रत्येकाचे अनुभवाला येत आहे. यामुळें संसारांत किती अडचणी सोसाव्या लागतात व क्षुल्लक कामाकरतां किती वायफळ खर्च होतो ह्याचाही प्रत्येकाला अनुभव आहे. ह्या शिक्षणामुळें स्त्रिया अशक्त होऊं लागतात व याचें कारण त्यांना अलीकडील शिक्षण देणारें त्यांचे आईबापच होत.

"स्त्रीधर्म" या विषयावरील एका लेखांत बाईंचे धर्मकार स्त्रियांना स्वातंत्र्य देणाऱ्या मंडळींच्या संबंधानें पुढीलप्रमाणें लिहितात—"सन १८८४ सालीं पुणें मुक्कामीं असतांना कांहीं समवयस्क मंडळींबरोबर फोटो काढविण्याकरतां ह्मणून आह्मीं लष्करांत गेलों होतों. तेथें एक पारशी गृहस्थ फोटो काढीत असे ........ ह्यानें आपल्या कामाचे मासले आह्मांला पुष्कळ दाखवले व त्यांतच त्याच्या नचरचुकीनें एक चमत्कारिक मासला आमच्या दृष्टीं पडला. लोहारकाम करणारा एक कळकट पुरुष व अंगावर अलंकार घातलेली एक रुपवती स्त्री ह्या दोहोंचा एके ठिकाणीं फोटो काढलेला आमच्या दृष्टीं पडला. तेव्हां आह्मीं त्या फोटोविषयीं तपास केला तों फारच वाईट प्रकार आह्मांस समजला. ही स्त्री .............. राहणाऱ्या एका मोठ्या गृहस्थाच्या कुलांतील होती. तिला पतिगृहीं अनेक पुत्र झालेले होते; परंतु, कुटुंबांतील पुरुष स्त्रियांना स्वातंत्र्य देण्याविषयीं झटणारे असल्यामुळें कुटुंबांतील स्त्रियांना—पुरुषांना न विचारतां देवदर्शनाकरितां—बाहेर जाण्याचा प्रतिबंध नसे, ह्यामुळें पतिगृहापासून पुष्कळच लांब रहात असलेल्या एका भिसाड्याशीं हिचें सख्य जमलें व पति, दीर, पुत्र, जाऊ, इत्यादि माणसें कुटुंबांत असतांना व हजारों रुपयांचे दागिने अंगावर असतांना ही स्त्री पतिगृहीं राहण्यास नाखुष झाली; व उघडपणें आपलें घरदार सोडून ती भिसाड्याच्या घरीं गेली."

कांहीं ब्राह्मण लोकांनाही स्त्रियांना आपल्याबरोबर हवा खाण्याला नेण्याची संवय लागली असल्याबद्दल धर्मांत उल्लेख आहे, त्याबद्दलची एक हकीकत "धर्मा"त दिली आहे ती अशी—" पुणें शहरांत बंडगार्डन ह्मणून हवा खाण्याची जागा तयार केलेली आहे .. ...... एके दिवशीं

सायंकाळीं एक ब्राह्मण गृहस्थ सपत्नीक ह्या उपवनांत गेले आणि वृक्षांच्या बाजूनें विहार करूं लागले. ही वेळ अगदीं झांजडीची होती व उपवनांत विशेष माणसेंही नव्हतीं. मद्यपान करून मत्त झालेले एक दोन लोक मात्र हिंडत होते. ह्या मत्त लोकांना भान न राहिल्यामुळें समोरून येण्याचें मिष करून ह्यांनीं रावसाहेबांच्या समक्ष बाईसाहेबांना धक्का तर दिलाच. परंतु रावसाहेबांच्या देखत बाईसाहेबांच्या कांहीं विशिष्ट अवयवांनांही घाईघाईनें स्पर्श करण्यास ते दुर्जन राहिले नाहींत....

..लोणावळ्यास हवा खाण्याकरतां सपत्नीक गेलेल्या एका रावसाहेबांच्याही सहधर्मचारिणीची ( छे छे! चुकलों! सहचारिणीची ) स्थिति अशाच प्रकारची झाल्याचें पुण्यांतील पुष्कळ लोकांना माहीत आहे."

प्रत्यक्ष नवरा बरोबर असतांना जर असे प्रकार होतात, तर स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य दिल्यावर मग किती भयंकर परिणाम होईल याचा वाचकांनींच विचार करावा. 'गृहिणी गृहमुच्यते' यावरून स्त्रिया घरकामाच्याच उपयोगी आहेत असें उघड दिसतें.

स्त्रियांना अलीकडील शिक्षण दिल्यानें त्याचा परिणाम कसा वाईट तऱ्हेनें होतो, व त्यामुळें तो मनुष्य स्वतःचे उपहासाला कसा पात्र होतो व लोकांत त्याला तोंड दाखविण्यालाही जागा रहात नाहीं, याचा एक मासला "स्त्रीविद्या वैचित्र्यदर्शन" प्रहसनांत दिला आहे तो येथें देतो.

वामनराव—माधवराव, मला बुवा आज एक फारच विलक्षण चमत्कार वाटतो-तो असा, कीं इतका वेळपर्यंत आपण रस्त्यानें गोष्टी बोलत आलों, पण त्यांत देशसुधारणुकीच्या संबंधानें तुमच्या बोलण्यांत एक अक्षर देखील निघालें नाहीं, हें कसें काय झालें ?

माधवराव- ( मागें पुढें पाहून ) वामनराव, तूं माझा लंगोटीमित्र आहेस, ह्मणून तुझ्या जवळ बोलायला मला बिलकूल शंका वाटत नाहीं. न बोलावें असा मी इरादा करीत होतों, पण बोलल्यावांचून आतां मनच धीर धरीनासें झालें आणि इतक्यांत तीच गोष्ट तूं विचारलीस-तेव्हां माझी खरी झालेली स्थिति तुला सांगावी, हेंच मला चांगलें वाटतें-गड्या, नको ती मला देशाची सुधारणा! ती तर मलाच पहिल्यानें उत्तम प्रकारची फळली! नको, इतक्या प्रकारचा तिचा मला वीट आला आहे!

१९२०२


वा०—अरे गृहस्था, त्या सुधारणुकेचा तुला वीट येण्यासारखें झालें तरी काय ? शोभेल तशी गोष्ट तरी मला सांग.

मा०—तो प्रकार मीच केवळ आपल्या तोंडानें सांगावा असें त्यांत कांहीं महत्व राहिलें नाहीं. त्या सर्व गोष्टी आतां जगजाहिर होऊन चुकल्या आहेत. विचारून मला कां बरें आणखी दुःख देतोस ?

वा०— तूं ज्या अर्थी माझा मित्र आहेस, त्या अर्थी तुला दुखवावें असा माझा हेतुच नाहीं. मी विचारायचें सोडलें.

मा०—या सुधारणुकेनें पहिलें काम हें आधीं केलें, कीं ती आमचें ऐकेनाशी झाली, आणि विलक्षण प्रकारची उनाड झाली !

वा०— मग त्यांत कांहीं फारसें वाईट झालें नाहीं. त्या तशा झाल्याच पाहिजेत.

मा०— मग तिचा लोकांबरोबर गुप्त पत्र व्यवहार सुरू झाला—

वा०— तो प्रकार तर तुम्हांला मोठा प्रिय झाला होता—

मा०— पुढें पुढें तर व्याख्यानाच्या ठिकाणीं त्या बेधडक असें म्हणूं लागल्या, कीं मिशा असतात म्हणून मात्र पुरुषांना पुरुष म्हणायचें !

वा०— अशा त्यांच्या रिमार्कसेनां तर तुम्ही टाळ्या पिटीत होतां !

मा०— त्या वेळेस आमचे डोळे उघडले नाहींत. .........आज दोन चार दिवस ती घरीं असून नसल्यासारखीच आहे. जेवीत नाहीं, खात नाहीं, कोणाजवळ बोलत नाहीं, आणि आज सकाळपासून तर ती कोठें बाहेरच गेली आहे—

वा०—कोण मथुरा वहिनी कीं काय ? ती तर तुमच्या शिक्षेत पक्की सुधारली आहे ! कांहीं भांडलां असाल ? शिकलेल्या बायकांना नवऱ्या-बरोबर भांडण करण्याच्या खोडीच लागल्या आहेत—मग त्यांनीं रुसावें आणि नवऱ्यांनीं 'प्लीज एक्सक्यूज" असें म्हणून त्यांची समजुत करावी. जा, जा तर कोठें रुसून बसण्याच्या ठिकाणीं समजुतीला.

मा०—"प्लीज एक्सक्यूज" असें म्हणण्यासारखा आतां प्रकार राहिला नाहीं—आणि भांडण तर खरेंच झालें आहे, आणि त्यामुळें तर इतक्या थराला गोष्ट येऊन ठेपली आहे, कीं पुन्हां तिचें मुखावलोकन-

देखील करूं नये. या असल्या अर्धवट शिक्षणानें आणि आमच्या अविचारानें बायका अगदीं नादान होतात ह्मणून जें तुह्मी ह्मणतां, त्याचा प्रत्यक्ष अनुभव मला आला. काय सांगूं तिनें जो एकेक खेळ कलान् तो !

**वा०**—पुरे पुरे कर—ते खेळ आतां तुझ्या तोंडून ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. एकवार गोष्ट होऊन चुकली. आतां इतकेंच पूर्णपणीं लक्षांत ठेवा कीं दुसऱ्यांचें अनुकरण केल्यापासून असले भयंकर परिणाम होतात ! पुन्हां अशा भानगडींत पडूं नका, आणि हीच ठेंच लागली असें समजून पुढें जपून वागा ह्मणजे झालें.

स्त्रीला अलीकडील शिक्षण मिळाल्यामुळें ती किती दुराचारी बनली व पुढें ती संसारसुखाला कशी मुकली व यामुळें तिला पश्चात्ताप झाल्यावर तिचे या शिक्षणासंबंधानें कसें वाईट मत झालें याचाही एक मासला "स्त्रीविद्या वैचित्र्य दर्शन" प्रहसनांत आहे तो येथें दिला असतां वावगें होणार नाहीं.

**मथुरा**— नका ग बायांनों असे-छद्मी बोल बोलूं. मला मरणापेक्षांही जास्त दुःख झालें आहे ! पण तुमच्याजवळ तें कसें सांगूं ?

**सरस्वति**— हो " सुडूक सोवळं न् बुडूक ओंवळं " अशांतलें तुझें दुःख. नाहीं तर काय ? तुह्मी सुधारलेल्या बायका. त्यांत देशकल्याणाचीं कामें अंगावर घेतलेल्या पुरुषांबरोबर फिरायला संवकलेल्या, आणि धर्मसंबंधानें आहार प्रकरणीं अग्नीदेवालाही लाजिवणाऱ्या ! त्याचप्रमाणें विहार संबंधानें चतुष्पादांनीं मागें हटिवणाऱ्या, तुह्मांला ग कशानं दुःख व्हावं ? सदां सोवळ्या नि सदां सुखी बायका तुह्मी !

**म०**— सरस्वतीबाई, तुह्मीं ह्मणालां त्या सर्व गोष्टी खऱ्या. पण खरंच सांगतें त्याच गोष्टी माझ्या दुःखाला कारण झाल्या आ त !!! त्या आणंदीबाई, आपल्या नवऱ्याच्या फासांत सांपडल्या नाहींत हें सोन्याहून पिवळें झालें ! नाहीं तर माझी नि त्यांची एकच स्थिति झाली असती. त्या मोठ्या भाग्यवान्. मी पोटांतली गोष्ट आतां तुमचेजवळ सांगतें. पतीची निंदा करूं नये, असा जुना शास्त्रार्थ आहे, त्यानं मला किती पातक लागेल तें लागो, मला पतकरलं.

पण काय उघड करून सांगूं बाई ? देशकल्याणार्थ ती स्वतंत्रेची दीक्षा मी धारण केल्यापासून कुटुंबामध्यें असून जें संसार सुख मला मिळायचं, त्याला मी आतां या जन्मांत तर आंचवलें. आमचा सदोदित ३६ चा आकडा ! त्यांनीं घरांत यावं, कीं मी बाहेर पडावं; त्यांची बाहेर जाण्याची वेळ, ती माझी घरांत येण्याची; न कुणी बोलता न सवरता. पडलें मी स्वच्छंदी आणि स्वतंत्रतेच्या छायेंत !! झाली एक गोष्ट. आतां दुसरी ऐका. देशकल्याणाचें काम म्हणून जें मी केलं, तें मी सुधारलेलीं नाटकें पाहून—तुम्हां कुलस्त्रियांच्या देखत तसले घाणेरडे शब्द तोंडावाटें काढण्यास मला लाज उत्पन्न होते-यांत समजा. असलीं नीच कर्मे करण्यास मी प्रवृत्त झालें ! यांचं देशकल्याण म्हणून काय जें, तें आतां पुरतेपणीं माझ्या अनुभवास आलं—देशाचं कल्याण एवढे शब्द मात्र मला तोंडांतून काढतां येऊं लागले—परंतु देशाचं कल्याण म्हणजे काय, नि तें काय केल्यांत होईल, हें मला तर नाहींच कळलं, परंतु या हातांत तुणतुणं धरलेल्या मंडळींत कुणाला समजलसं मला बाईल बुद्धीला वाटत नाहीं. त्यामुळें देशसुधारणा म्हणजे आम्हां स्त्रियांची सर्व लज्जा खुंटीवर गुंडाळून ठेवून स्वतंत्रतेच्या मिषानं आम्हांला पुरुषांत मिसळवावयचं ! हो, म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं—कीं स्त्रियांची जातं आधींच चंचळ, तशांत असल्या फुसक्या शिक्षणानं संस्कृत, नि त्यांत त्यांना रात्रंदिवस प्रेमरसानें भरलेल्या पुस्तकांचा सहवास, नि या सगळ्यांवर अनेक पुरुषांच्या पूर्ण शृंगाररसयुक्त प्रेमलोटदर्शित शेकह्यांडची फोडणी !!! मग परदाराला त्यांच्यानं दूषित म्हणवेल काय ? स्त्रीशिक्षणापासून असलें हें देशकल्याण आहे हो ! विधवांचीं लग्नें व्यभिचार बंद होण्याकरतां म्हणून हे करणार ! परंतु व्यभिचार म्हणजे काय, हें यांच्या ज्ञानाला जसं कांहीं कळतच नाहीं. पति असणाऱ्या स्त्रियांनीं चिव्या चपाव्या करून, नि विधवांनीं लोकांच्या संमतीनें परपुरुषसंग केला असतां व्यभिचार नाहीं !!! असा यांचा शास्त्रार्थ ! ..... सरस्वती, आतां कोणी बायका शाळेंत जावोत अगर न जावोत. मी कांहीं म्हणून त्यांना उपदेश करायला जाणार नाहीं. कारण शिकणाऱ्या बायकांना खरी हकीकत सांगूं लागलें, तर त्यांना

माझ्या सारखा अनुभव येईपर्यंत त्या माझी थट्टाच करणार !.........
मी हें खास तुह्मांला सांगून ठेवतें. हल्लीं देशसुधारणुकेचें ह्मणून जें बंड निघालें आहे, नि त्याच्या साह्यार्थ स्त्रीशिक्षण, स्त्रियांचें स्वातंत्र्य, स्त्रियांचा पुनर्विवाह, बालविवाह निषेध, वर्णसंकर, विपरीत धर्मस्थापना, वगैरे प्रकारांनीं जे लोक, चार दिवस नव्या उमेदीनें नाचले, ते अनयत्र खेरीज करून मनुष्यकोटींतले निवळ पशू आहेत, असा तर स्त्रीमतीनें माझा पूर्ण ग्रह झाला आहे ! मग हा कुणाला कसाही वाटो ! या प्रकारांनीं देशाची सुधारणा बिलकूल न होता शास्त्रीय नीति नि आचार यांचा ऱ्हास होऊन, आपली पुढची संतति, आपले सासरे, आजे, पणजे यांच्या सारखी पराक्रमी, अभिमानी व कुटुंबपोषक न होतां, आळशी, निलाजरी नि अनागलवतनवत् होईल ! ! ! आमच्या मामंजींनीं रोजगारावर असतांना दिवीळ कुणाला अमर्याद शब्द बोलूं दिला नाहीं, पण तेच तुमचे आमचे यजमानांकडे पहा ! रात्रंदिवस कि हो लोकांची पायमल्ली चालली आहे ? आह्मी आपल्या बायकांना विद्या शिकवितों, आमच्या विधवांचे पुनर्विवाह करतों, आह्मीं आपल्या बायकांना स्वातंत्र्य देतों, अठरा पगड जातीची आह्मीं एकी करतों, असल्या नामर्दाईच्या गोष्टी बोलून कीं हो पोटपूजेला लागले आहेत ! धिःकार असो या भागूबाई पुरुषांचा ! !

नवीन तऱ्हेचें राष्ट्रीय शिक्षण घेऊन नवीन मंडळी तयार झाली व ती आपणाला गृहस्थ ह्मणवूं लागली. याच नवीन पिढीपासून लोक धर्मापराङ्मुख झाले, त्यांचे पूर्वींचे आचार विचार त्यांना वाईट दिसूं लागले व त्यांनीं इंग्रजी आचार-विचाराचें अनुकरण करण्यास सुरवात केली; पूर्वींचे तेवढें सगळें वाईट असें त्यांना वाटूं लागलें, अभक्ष्याभक्ष्याचा विधिनिषेध त्यांचे ठिकाणीं राहिला नाहीं, जातिभेद त्यांना गैर व देशाचे लोकांतील ऐक्याला बाधक आहेत असें वाटूं लागले, बालविवाहा पासून अनिष्ट परिणाम होतात, तेव्हां ते बंद केले पाहिजेत, स्त्रियांच्या मुंजी केल्या पाहिजेत, त्यांना स्वतंत्रता दिली पाहिजे, याशिवाय समाजाची स्थिति सुधारणार नाहीं, त्यांना शिक्षण देण्याकरतां शाळा स्थापन झाल्या पाहिजेत वगैरे प्रकारचे विचार त्या मंडळीचे बनले व त्याप्रमाणें

त्यांचें आचरण होऊं लागलें. या सर्वांला कारण स्वधर्माचरणाचा अभाव हेंच होय.

वरील सर्व प्रकाराचा थोडासा विस्तारानें येथें उल्लेख करावयाचा आहे.

वरील प्रकारचें विचारवैचित्र्य महाराष्ट्रांत इंग्रजी राज्य सुरू झालें तेव्हांपासून व त्यांचें इंग्रजी शिक्षण मिळूं लागल्यापासून झालें. महाराष्ट्र इंग्रजांनीं काबीज केलें तेव्हां त्यांना येथील लोकांत असंतोष उत्पन्न होऊं नये असें वाटत होतें. कारण त्यांचें त्यांनीं स्वातंत्र्य हरण केलें होतें व एवढ्याकरतां त्यांना जेणेंकरून संतोष होईल अशी ते प्रत्येक गोष्ट करीत होते. त्यांतच त्यांनीं इंग्रजी शिक्षण येथील लोकांना देण्यास सुरवात केली. व थोडेंसें इंग्रजी शिकलेल्या लोकांना त्यावेळीं ते चांगल्या पगाराच्या जागा देऊं लागले. थोडेंसें इंग्रजी शिकल्यावर चांगले पगारांची नोकरी मिळते या आशेवर सर्वजण इंग्रजी शिकूं लागले. व आपली मूळ विद्या व धर्म त्यांनीं अजीबात सोडला व ते सर्वच बाबतींत इंग्रजांचें अनुकरण करूं लागले. यावरून इंग्लिशांनीं तुमचे धर्माचे विरुद्ध आचरण करा, व इंग्रजी शिका असें मुळींच सांगितलें नाहीं. तुह्मीं आपण होऊनच त्यांचे सर्व चाली रीतीचें अनुकरण केलेंत व त्याचाच परिणाम हल्लीं तुह्मांला सोसावा लागत आहे. इंग्लिशांनीं आपला धर्म सोडला नाहीं, आपले आचारविचार सोडले नाहींत, व त्यांना त्यांचे पूर्वज मूर्ख होते असेंही वाटत नाहीं; परंतु तुह्मीं मात्र आपला धर्म व आचार सोडला व दुसऱ्या धर्माचें व आचारांचें अनुकरण केलें. यांत दुसऱ्याला दोष देणें अगदीं गैर आहे. व ' यथा राजा तथा प्रजा ' हें ह्मणणेंही स्वधर्मासंबंधानें गैर आहे.

मुख्य चार वर्ण व त्यांचे संकरापासून उत्पन्न झालेल्या अनेक जाती; त्यांची योग्य प्रकारची व्यवस्था राखण्याचें काम बुद्धीनें श्रेष्ठ, अकलेचे फर्डे अशा ब्राह्मणांचें; परंतु हें हल्लींच्या विद्वान् पुढाऱ्यांना नको आहे. सर्व गोळेकार असावा व त्यांतच हिंदुस्थानचें हित आहे असें त्यांना वाटत आहे. अनिवार होत असलेल्या लोकांच्या विस्ताराला आळा घालण्याच्या हेतूनें पोटव्यवस्थेदाखल आचारविचारावरून ज्या अनेक जाति पूर्वींपासून आहेत, त्या योगानें सामाजिक स्थिति नियमित आटो-

स्थांत रहात असल्यानें, एकंदर राष्ट्रीय समाजाला विशेष प्रकारची वळकटी असते असा सर्वत्र अनुभव आहे. अशा प्रकारच्या या अनिवार लोकसमाजाला आजपर्यंत आळा न पडता, आणि सर्व गोळंकारच रहाता, तर युरोपांतील सोशिआलिस्ट किंवा निहिलिस्ट लोकांसारख्या टोळ्या माजून, रोज कसले कसले भयंकर परिणाम घडून येते! परंतु हल्लीं सर्व जाति एक करण्याबद्दल ज्या आमच्या पुढाऱ्यांच्या खटपटी चाललेल्या आहेत त्याचा परिणाम वाईट झाल्यावांचून रहाणार नाहीं.

**स्त्रीशिक्षण व स्त्रीस्वातंत्र्य**—ह्या कोन्या कशा काय निघाल्या असतील तें असो. स्त्रियांना मिळालेल्या पूर्वींच्या शिक्षणापासून त्यांचें स्वातंत्र्य तर हरण झालेलें नाहींच, परंतु त्या धर्मनिष्ठ व गृहकृत्याला योग्य व गृहस्वामिणी झालेल्या आहेत व त्यामुळें त्यांनीं पुरुष जातीला आपलें अंकित करून सोडलें आहे. व ह्याचा अनुभव हिंदु रीतीभातींनीं चालणाऱ्या प्रत्येक पुरुषाला आहे. असें असूनही, तें तसें नाहीं ह्मणून, स्त्रियांना स्वातंत्र्य आणि शिक्षण दिलेंच पाहिजे असें हल्लींच्या शहाण्या ह्मणवणाऱ्या पुढाऱ्यांचें अजून ह्मणणें आहेच. " स्त्रियांना लिहितां वाचतां येणें हेंच त्यांचें योग्य शिक्षण, आणि बूट स्टॉकिंग पायांत घालून अत्यंत सुकुमारत्वाची छाया नीटनेटक्या नखऱ्यांनीं शरीरावर उमटविणें, आणि हांसत हांसत " वेल् माय डियर " करीत पुरुषांच्या हातांत हात घालून इव्हिनिंग वॉक घेण्याला जाणें" यांतच स्त्रियांचें स्वातंत्र्य आहे व यामुळेंच देशाची उन्नतावस्था होईल असें हल्लींच्या पुढाऱ्यांना वाटत आहे. फार प्राचीन काळापासून चालत आलेली शिक्षणाची व स्वातंत्र्याची परंपरा आमच्या समाज स्थितीला सुयंत्र चालविणारी आहे. असें असून ती परंपरा हल्लींच्या शहाण्या ह्मणावणाऱ्या पुढाऱ्यांना पसंत नाहीं. व त्यासाठीं त्यांनीं स्त्रियांना अलीकडील नवीन शिक्षण व स्वातंत्र्य देण्यास सुरुवात केली आहे. या स्त्रीशिक्षणाचे व स्त्रीस्वातंत्र्याचे परिणाम कसे वाईट होतात यांचे मागें दिलेल्या दोन उताऱ्यांवरून वाचकांचें लक्षांत येईल. नुकताच ता २८ फेब्रु. १९०७ च्या " जामेजमशेद " नांवाचे पारशी दैनिक पत्रांत आस्ट्रेलियन लोकांचें इंग्रजी स्त्रीशिक्षणासंबंधानें काय मत आहे याबद्दल एक लेख आला आहे. त्यांत स्पष्ट असें ह्मटलें आहे कीं, आमच्या

स्त्रियांना अलीकडील शिक्षण नको ह्मणजे त्यांना राजकीय किंवा यांत्रिक कलेचें व कलाकौशल्याचें शिक्षण नको; तर त्याऐवजीं त्यांना पूर्वीचें गृहशिक्षण दिलें पाहिजे. हें असें स्त्रीशिक्षणासंबंधानें त्याचेच जातभाई जे आस्ट्रेलियन लोक यांचें मत आहे व त्यांचे त्यांनाच ह्या शिक्षणाचे परिणाम चांगले झालेले दिसत नाहींत, हें उघड दिसतें. त्यांचें शिक्षण आमच्या हिंदुस्थान देशाला अगदीं भिन्न आहे, असें शिक्षण तरी स्त्रियांना देण्याबद्दल आमचे शहाण्या पुढाऱ्यांनीं हट्ट कां धरावा हें समजत नाहीं.

हल्लींच्या स्त्रियांना मिळत असलेल्या शिक्षणापासून स्त्रीपुरुषांचे खऱ्या सुखाचा नाश होत आहे. गृहसंबंधीं सर्व कामें मुलींना येऊं लागल्यावर त्यांना पौराणिक व नीतिपर ग्रंथ वाचण्याला येण्यापुरतें शिक्षण देऊं नये असें कोणीही शहाणा मनुष्य ह्मणणार नाहीं. हल्लींच्या शिक्षणानें पुरुषांप्रमाणें स्त्रिया अशक्त होतात ह्याबद्दल पूर्वीं लिहिलेंच आहे. हल्लीं मुलींच्या शाळेंत त्यांना चेंडू कसे उडवायचे तें शिकवतात; परंतु यानें त्यांचे प्रपंचाला कांहीं फायदा नाहीं. लोकरीचें काम, पोताचें काम वगैरे कामें त्यांना येतात, पण घरचें काम मुळींच येत नाहीं. पूर्वींच्या मुलींना गृहशिक्षण मिळाल्यावर त्यांना पुढीलप्रमाणें धार्मिक व नैतिक शिक्षण त्यांच्या आयांकडून मिळत असे. अहिल्या; द्रौपदी, सीता, मंदोदरी वगैरे पतिव्रता स्त्रियांची गाणीं; मंगळागौर, श्रावणी रविवार, वर्णसट. नागपंचमी हरितालिका वगैरे व्रतांच्या कहाण्या द्रौपदीचा धांवा, सीतास्वयंवर, द्रौपदीस्वयंवर, रामाचा वनवास, वगैरेची गाणीं; या गाण्यांचा अर्थ त्यांना समजून देत असल्यामुळें त्यांना प्रपंचांत येणाऱ्या अडचणी सहन करण्याची शक्ति असे. हल्लींच्या शहाण्या मुलींना ह्यांपैकीं एकही येत नसतें. शिवाय वरील तऱ्हेचें शिक्षण बिन खर्चानें होतें. गृहशिक्षण व धर्म–नीतिशिक्षण त्यांना मिळत असल्यामुळें त्यांना प्रपंचाची काळजी आपोआपच लागत असे व ह्मणून त्या सर्व कामें स्वतः करून थोड्या मिळकतींत सुद्धां आपल्या नवऱ्याचा प्रपंच उत्तम रीतीनें चालवीत असत. परंतु हल्लींचें शिक्षण पूर्वींचे शिक्षणाचे अगदीं उलट झालें आहे व त्यामुळें प्रत्येक कर्त्याचें ...

होत आहे. हल्लींच्या स्त्रीशिक्षणाचे परिणाम कसे वाईट होतात याबद्दल पूर्वी दिलेल्या उताऱ्यांवरून वाचकांना सहज कळणार आहे.

बालविवाह—" बालविवाहाची चाल लोकांच्या शारीरिक, औद्योगिक, आणि सामाजिक हिताचा विघात करणारी आहे, व पूर्वीच्या वैद्यशास्त्रावरील ग्रंथांनीं, सध्यांच्या विद्वज्जनांनीं, अपायकारक ह्मणून दूषिली आहे. त्याच प्रमाणें आमच्या धर्मशास्त्रासही ती संमत नाहीं." अशा प्रकारची सामाजिक परिषदेचीं मतें आहेत परंतु हें त्यांचें ह्मणणें अगदीं व्यर्थ आहे. खोड ठेवण्यासारखे बालविवाह क्वचित् होतात, परंतु सद्ध्यांची प्रजा ही ज्यांची वंशज आहे, त्याचे व त्यांच्या पूर्वजांचे विवाह बालपणींच झालेले होते. उदाहरणार्थ कुंटे बंधु, रा. ब. रानडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, वामन आ. मोडक. वगैरे वगैरे. ही मंडळी बालविवाह प्रचाराचे मंडळीचीच संतति होय. ह्यांना ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें असेल त्यांना त्यांचे शारीरिक शक्तीची कल्पना असेलच. त्या वेळीं लोकांना खाण्यापिण्याची ददात नसे व त्यामुळें त्याचे पिंड मजबुत असत. ह्मणून बालविवाह प्रजा अशक्त होण्यास कारण मुळींच नाहीं. अन्नमय प्राण, व प्राणमय पराक्रम हें सर्वसाधारण तत्व प्रत्येकाला माहित आहे. अर्थात् बालविवाह हा शारीरिक व सामाजिक हिताला नुकसान करणारा मुळींच नाहीं. ज्याच्या महा प्रयासानें इंग्लिशांना महाराष्ट्राचें राज्य प्राप्त झालें, तो प्रसिद्ध वॉरन हेस्टिंग्ज हा बालपणीं विवाह झालेल्या इसमाचाच मुलगा होय. तसेंच सुधारकांचे अध्वर्यु जे कै. न्या. तेलंग ह्यांनीं आपल्या मुलीचा विवाह ती सात वर्षें वयाची असतांनाच केल्याचें प्रसिद्ध आहे. हे बालविवाहाला प्रतिकूल असूनही त्यांनीं आपले मुलीचा विवाह लहानपणींच कां केला ? तर बालविवाहापासून फायदा असेल ह्मणून. ज्यांनीं पेशवाई मिळवली, ज्यांनी पानपत सारख्या लढाया मारल्या, ते पेशवे व शिवाजी महाराज यांसारखी मंडळीसुद्धां बालविवाहाच्या प्रजेचीच संतति होती हें जर हल्लींच्या विद्वान् व शहाण्या मंडळीला माहित असतें, तर त्यांनीं बालविवाहापासून देशाचें नुकसान होते, प्रजा अशक्त होते. वगैरे सारखे प्रलाप काढले

पूर्वींचे उद्योग धंद्याची वाढ करण्याचें कांहींनीं योजिलें आहे. हिंदुस्थानांतील सर्व धंदे बुडाले व त्या धंद्यांत लोक तयार करण्यासाठीं आमचे शहाणे ह्मणवणारे लोकांनीं अमेरिका, जपान, जर्मनी वगैरे देशांतील उद्योगधंदे शिकण्याकरतां मोठा खर्च करून त्या देशांत लोक पाठविण्यास सुरुवात केली आहे. परंतु यापासून कांहीं एक फायदा व्हायचा नाहीं. ब्राह्मणानीं हे धंदे शिकून ब्राह्मणांचा व हिंदुस्थानचा अभ्युदय केव्हांहीं होणार नाहीं. त्यांना पूर्वींचे धंदे जर कायम ठेवावयाचे असतील व देशाची उन्नति व्हावी अशी जर त्यांची खरोखर इच्छा असेल, तर त्यांनीं स्वतः आपले धर्माप्रमाणें, देशाप्रमाणें व कुलाप्रमाणें वागण्याला लागलें पाहिजे. व पूर्वीची जातिवर्गीकरणाची पद्धत अमलांत आणली पाहिजे. ह्मणजे ब्राह्मणांनीं इतर जातींचे धंदे करण्याचें सोडलें पाहिजे. ब्राह्मण आपले धर्माप्रमाणें वागूं लागले ह्मणजे त्यांच्यावर कोणतेंही संकट येणार नाहीं. हल्लींची आपत्ति येण्याला मुख्य कारण स्वधर्माचरणाचा अभाव हेंच आहे. आपत्कालीं ब्राह्मणानीं कोणताही धंदा करावा असें कोणी ह्मणतील; परंतु आपत्ती येण्याला मुख्य कारण स्वधर्माचरण सोडणें हें आहे. ह्मणून त्यांनीं स्वधर्माचरणानें वागावें ह्मणजे त्यांची आपत्ती नष्ट होईल. इतक्यानेंही आपत्ति आली तरीसुद्धां धर्माला अयोग्य असा धंदा त्यांनीं करूं नये.

जातिवर्गीकरण सुटल्यामुळें हल्लीं कोणी कोणता धंदा करावा याचा नियम राहिला नाहीं. व त्यामुळें वाटेल त्यानें वाटेल तो धंदा करावा असें होऊन गेलें आहे. ज्याचा जो धंदा तो त्यानें केला नाहीं तर कसें नुकसान होतें यांचीं अलीकडे चांगली उदाहरणें घडून येत आहेत, व त्यावरून तरी आमच्या हल्लींच्या शहाण्या ह्मणवणाऱ्या पुढाऱ्यानीं चांगला धडा घ्यावा. हीं उदाहरणें ह्मणजे अलीकडे होणारे संप होत. सुमारें सात आठ वर्षांपूर्वी रेल्वेतील तारमास्तारांचा संप झाला होता व गेल्या वर्षी येथील पोस्टांतील शिपायांचा संप झाला होता. पैकीं तारमास्तरांचा संप टिकला नाहीं व पोस्टांतील शिपायांचा संप टिकला व त्यांच्या मागण्या पुष्कळ अंशानें अधिकाऱ्यांनीं कबुल केल्या. याचें

पगारांत रेल्वेचे अधिकाऱ्यांला तें काम करणारे इतर लोक मिळाले व त्यामुळें तो संप टिकला नाहीं, व संप करून कंपनीचें कांहीं एक नुकसान झालें नाहीं; उलट संप करणारांचेंच नुकसान झालें परंतु पोरटांतील शिपायांचा संप टिकण्याचें कारण तें काम करणारे लोक मिळण्याची मुश्किल. कारण तें काम फार दगदगीचें व सर्व धंदे करूं पहाणाऱ्या ब्राह्मणांना तें अशक्य; यामुळें तो संप टिकला. या संपाचें वेळीं सरकारानें वाटेल तसा खर्च करून बाहेरगांवचे लोक आणवून पाहिले; परंतु पूर्वीप्रमाणें काम होईना व त्यामुळें त्यांचे कामाची फार अडचण होऊं लागली. त्यामुळें त्यांनी शिपायांच्या बहुतेक मागण्या कबूल केल्या व त्यांचे संपातील गैरहजिरीचें दिवसही पगारी धरून त्यांना फिरून कामावर बोलावलें. यांतील मुख्य तत्व तरी जातिवर्गीकरणच होय.

जातिवर्गीकरणाचें एवढें महत्व कां? याला आपण आणखी एक व्यवहारांतील उदाहरण देऊं. भंगी ही जात अगदीं हलके प्रतीची आहे. या जातीचा धंदा शौचकूप साफ करणें, व मल नेणें हा आहे. समजा, या जातीनें जर उद्यां संप केला व आमच्या अमुक अमुक अटी आहेत, त्या तुह्मीं पाळल्या तरच आह्मीं आपलें काम पूर्ववत् करूं, नाहीं तर करणार नाहीं असें त्यांनीं ह्मटलें व जर काम बंद काम पाडलें तर तें त्यांचें काम करण्याला ब्राह्मण वर्गातील एकही मनुष्य तयार होणार नाहीं उलट असें ह्मणेल कीं तें आमचें काम नाहीं, तें हलके जातीचें आहे, तें काम करण्याला धर्माची व रूढीची संमति नाहीं. कारण तें काम अगदीं नीच आहे व ह्मणून तो तें करणार नाहीं. एवढेंच नाहीं तर भंग्यांशिवाय इतर कोणतीही जात तें काम करणार नाहीं. अर्थात् भंग्यांचें सर्व ह्मणणें कबुल करणें भाग पडेल. पोट भरत नाहीं ह्मणून जर ब्राह्मण इतर जातीचे धंदे करतात व त्यांत जर त्यांना हलकेपणा वाटत नाहीं, तर त्यांना भंग्याचे धंद्यांत तरी हलकेपणा कां वाटावा! व तेवढ्यापुरतेंच त्यांनीं जातिवर्गीकरण व रूढी ह्या सबबी कां पुढें आणाव्या? जातिवर्गीकरण जर अशा रीतीनें ते कबुल करतात, तर त्यांनीं सर्व बाबतींत तसें वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

नाहीं असें हल्लींच्या विद्वान् व शहाण्या मंडळीला वाटत आहे व त्यासाठीं ते जपान, अमेरिका, जर्मनी वगैरे देशांत इंग्रजी शिकलेले ब्राह्मण लोक पाठवीत आहेत. परंतु ब्राह्मणांचा हा धंदा नाहीं, तेव्हां त्यांनीं कोष्टी, लोहार, सुतार, चांभार वगैरे जातींच्या लोकांची बेतापुरतें इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था करावी व त्याच धंद्याचे लोकांना त्या देशांत ते धंदे शिकण्यासाठीं पाठवावें. असें केलें असतां परस्पर जातींत वैमनस्य न होतां त्या सुखी होतील व जातीवर्गीकरणही टिकेल.

**ब्राह्मणांच्या रीतिभाती**—नवीन राष्ट्रीय शिक्षणानें ब्राह्मणांचे विचार आपले धर्माचे विरूद्ध झाले व त्यांना आपलें जुनें शिक्षण चांगलें दिसेनासें झालें; बालविवाह त्यांना वाईट दिसूं लागला, विधवाविवाह झाल्याशिवाय समाजाची स्थिति सुधारणार नाहीं, स्त्रियांना अलीकडील शिक्षण दिलें पाहिजे वगैरे तऱ्हेचे अपूर्व विचार त्यांचे झाले, याबद्दल पूर्वी थोडासा उल्लेख केला आहे व त्याचे कसे वाईट परिणाम होतात तेंही दाखविलें आहे. स्वधर्मच ज्यांना वाईट दिसूं लागला त्यांचे वरील प्रकारचे विचार व्हावे व त्याप्रमाणें त्यांचें वर्तन व्हावें हें साहजिक आहे. त्यांना स्नानसंध्या, देवपूजा, वैश्वदेव वगैरे नकोसे झाले; मूर्तिपूजा खोटी आहे, देव म्हणून कांहीं नाहीं सोंवळेंओंवळें ढोंग आहे, हें करण्यापासून देशाचें नुकसान होतें असें त्यांना वाटूं लागलें. डोक्यांवर केस ठेवणें त्यांना आवडूं लागले, त्यांचा पूर्वीचा पेशवाई अंगरखा, बंड्या, वगैरे पोषाख त्यांना आवडेनासे झाले, व ते इंग्रजी पद्धतीचे कोट, ज्याकिटे शर्ट वगैरे वापरूं लागले. त्यांना पागोटीं नकोशीं झालीं व इंग्रजी चटईच्या टोप्या ते वापरूं लागले. धोतरें नेसणें नकोसे झालें व त्याचे बदलीं त्यांना पाटलोणी आवडूं लागल्या, गंध लावणें नकोसें झालें; ( चित्र नं. १४१ ते १४४ ); तसेंच चहा पिणें, विलायती सिगारेट ओढणें वगैरे व्यसनें ( आवडीचीं ) लागलीं; चहा पिणें व इतर उपहारासाठीं ब्राह्मणांचीं उपहारगृहें स्थापन झालीं व हीं गेल्या दहा वर्षांत फारच झालीं आहेत व तेथें सर्व जातीचे लोक एकाच टेबलावर बसून चहापान व इतर पदार्थ खात असतात ( चित्र नंबर १३१ ते १३६ ). त्याचप्रमाणें खाणावळीही फार वाढल्या आहेत व तेथें शेंकडा ९० ब्राह्मण ओंवळ्यानें जेवायला बस-

तात; कांहीं तर टोपी काढून बाकीच्या सर्व पोषाकासह पाय वगैरे न धुतां जेवायला बसतात. ( चित्र नंबर ११० ते १३० ). या ओंवळ्यानें जेवणाऱ्या लोकांना जर एखाद्यानें विचारलें कीं काय हो, तुह्मीं ओंवळ्यानें कां जेवतां ? तर हे धडधडीत असें सांगतात कीं खाणावळींत सोंवळें ओंवळें नाहीं, मग आपण सोंवळें नेसून काय फायदा ? असें ह्मणून आपल्या ओंवळ्यानें जेवण्याचा दोष खाणावळवाल्यावर ठेवतात. परंतु हें यांचें ह्मणणें अगदीं गैर आहे असें मला वाटतें. असें सांगणाऱ्या सर्व लोकांनींच जर खाणावळवाल्याला सांगितलें कीं, आह्मांला सोवळ्यानें जेवावयाचें आहे, तर आपण सोवळ्याची व्यवस्था चांगली ठेवा, व गड्यानें घांसून धुतलेलीं ताट वाट्या ब्राह्मणाकडून फिरून धुववुन मग आह्मांला मांडींत जा. हें असें स्पष्ट सांगितल्यावर तो तें नाकबूल करील असें मला मुळींच वाटत नाहीं. हीच स्थिति बायकांची झाली आहे. त्यांना जुन्या चालीच्या बांगड्या नकोशा झाल्या आहेत व त्याचे बदलीं राणीचा बावटा वगैरे सारख्या बांगड्या आवडूं लागल्या आहेत; लुगड्यांचे बदलीं चुनड्या आवडूं लागल्या आहेत; वेणी घालण्याचे ऐवजीं बुचडा घालण्याची सवय लागली आहे. मोठें कुंकूं लावणें आवडत नसून बारिक टिकली आवडुं लागली आहे व पूर्वीच्या साधेपणाच्या चाली नकोशा होऊन सर्वांना नखरेबाज रीतीनें वागण्याची संवय लागली आहे ( चित्र नंबर १४५ ते १४७ ); जुनी देवादिकांची गाणीं आवडत नसून संगीत शारदा, विक्रमशशिकला, सत्यविजय या नाटकांतील गाणीं त्यांचे तोंडीं बसलीं आहेत; ओंवळ्यानें जेवण्याची तर बहुतेक अलीकडल्या बायकांना संवयच पडलेली आहे. अशा रीतीनें ब्राह्मणांचा आचार अगदीं बिघडलेला आहे.

"शिखासूत्र क्लब" स्थापन करून हिंदुंच्या चालीरीतिप्रमाणें वागणाऱ्या सुशिक्षित मंडळीला ताळ्यावर आणून आपल्या धर्माप्रमाणें वागण्यास लावणाऱ्या रे. अॅट्किन्सन्" साहेबांनीं आपल्या जातभाईंना केलेला उपदेश आमच्य अनुकरणप्रिय सुधारक मंडळींनी विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे, ह्मणून त्याचा उतारा संक्षेपरूपानें अहमदनगरच्या जगदादर्श पत्रांतून येथें उतरून घेतला आहे:—

" विलायतेंत शिखासूत्र क्लब असें नांव देऊन त्या क्लबांत हिंदुंच्या कांहीं रीतींना भाळलेल्या कांहीं सुशिक्षित युरोपियनांनीं हिंदूप्रमाणें पोषाख करण्याचा आणि शेंडी ठेवून जानवें घालण्याचा ठराव केला व आपल्या बायकांनाही त्यांनीं लुगडीं व चोळ्या दिल्या. ही शिखासूत्र क्लबाची मंडळी धोत्रें नेसून व पागोटीं घालून फिरावयास गेली असतां रे० ऍट्टूकिन्सन् ह्मणून एक पाद्री भेटला व त्यानें त्यांना टोपीस हात लावून सलाम केला. तेव्हां पोषाखानेंच हिंदु बनलेल्या ह्या मंडळीनीं आपल्या डोकीच्या पुगेरी पगड्या काढून उलट सलाम केला. रे० साहेब हिंदुस्थानांत राहिले असल्यामुळें हातांत पागोटीं घेऊन सलाम करणारे हे ब्राह्मण नव्हेत असें त्यानीं ताडिलें आणि ह्मणाले, तुह्मी जातीनें युरोपियन असतांना हिंदुचा वेष कां धारण केला आहे ? ह्यावर स्वतःचें नांव गजानन ठेवलला आल्फ्रेड साहेब ह्मणाला, " या पोषाखात सोई फार आहेत. मलमूत्रोत्सर्ग सत्वर करतां येण्याची सोय या पोषाखात आहे. हिंदूंच्या स्नानसंध्यादि नेमधर्मांनीं मनास आनंद होऊन पूर्वीपेक्षां आह्मांस फारच स्वच्छता वाटते. डोक्यावर केंस असल्यामुळें आंत पाणी सांचून आजारी पडण्याची भीति असते व त्यामुळें रोज स्नान करता येत नाहीं. सांप्रत केंस काढून शेंड्या राखल्यामुळें त्रिकाळ स्नानानेंही आजारी पडण्याची भीति नाहीं. " ह्यावर रे० ऍट्टूकिन्सन् ह्मणाले, " तुह्मी ह्मणतां ह्या गोष्टी खऱ्या असतील, परंतु प्रत्येक देशांतील आचार-विचारांत आढळणारी भिन्नता त्या त्या देशाचे हवापाण्यावर अवलंबून आहे आणि त्याला अनुसरूनच त्या त्या धर्माच्या वेगळ्या वेगळ्या आज्ञा आहेत. मी कांहीं दिवसांपूर्वी हिंदुस्थानांत होतों, त्या वेळीं कांहीं ब्राह्मणाचीं मुलें मजकडे येऊं लागलीं. तीं प्रथम आपलाच पोषाख करीत, परंतु पुढें त्यांनीं डोक्यावर केंस ठेवून बूट पाटलोणींचा अंगिकार केला व आमचा चहाही त्यास पटूं लागला. पुढें तीं आमच्या टेबलावर बसून आमचें अन्न खाऊं लागलीं व शेवटीं त्यांनीं एके दिवशीं बाप्तिस्माही घेतला. संवईप्रमाणें मनुष्याच्या मनावर विकार होऊं लागतात. हिंदुस्थानांतील कित्येक हिंदु साहेबलोकांस, बरें वाटण्याकरतां ह्मणून त्यांचे पोषाख करून त्यांचे बरोबर भोजनास बसलेले मीं स्वतः पाहिलेले आहेत. परंतु

हें त्याचें कृत्य खऱ्या साहेब लोकांस हलकटपणाचें वाटतें... मुलांनो, तुह्मी काहीं दिवसांनीं पवित्र ख्रिश्चन धर्माचा त्याग करून हिंदु धर्माचा स्वीकार कराल. तुह्मी जसे हिंदूंचे पोषाक धारण केलेले आहेत तसेच हिंदुस्थानांतील कितिएक लोक युरोपिअनांचे पोषाख वापरूं लागले आहेत. परंतु अशा लोकांस मी स्वाभिमानशून्य समजतों. ज्यांस आपल्या धर्माचा, राष्ट्राचा व पोषाखाचा अभिमान नाहीं ते लोक त्या देशाचे कुपुत्र होत. आपले पूर्वज कातडीं पांघरीत असतांना हिंदूंचे पूर्वज फारच सुधारलेले होते. त्यांच्या धर्मांत व आचारविचारांत असलेली सुव्यवस्था दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं. परंतु, तिचा आपल्यास कांहीं उपयोग नाहीं. तुह्मी जसे त्याचे पोषाख चांगले ह्मणता तसे ते तुमचे पोषाख चांगले ह्मणतात. परंतु या दोघांच्या नुसत्या बतावण्या आहेत. युरोपियनांप्रमाणें डोक्यावर केंस न ठेवणारे हिंदु आंधळे झाले नाहींत, सन् हॅट न घालणारे लोक भाजून गेले नाहींत, आणि कोट, पाटलोण व बूट न वापरणारे थंडीनें मेले नाहींत. अरे, तुमच्यांत जर स्वदेशाचा व स्वधर्माचा अभिमान नाहीं, तर अज्ञानी लोकांना तो कुठून असणार! तुमचे अनुकरण तुमचीं मुलें करूं लागतील व अशा योगानें सर्व देशाचा अभिमान नाहींसा होईल. अरे, ज्यानें त्यानें आपापल्या धर्मानें वागावे. पोषाख, आचारविचार, अन्नपाणी वगैरे फिरविल्यानें काय होणार आहे? असें वाटतें खरें; परंतु त्याचा परिणाम शेवटीं भलताच होतो." हा उपदेश त्या मंडळीला चांगला पटला व त्यांनीं आपल्या ब्राह्मणी पोषाखाचें गाठोडें बांधून तें लंडनाच्या संग्रहालयांत पाठवलें व ते आपल्या बायकांना युरोपियन पोषाख देण्याकरतां तावडतोब घरीं गेले.

दुसरें उदाहरण—अर्थशास्त्राचें-सन १८३९ सालचा रुपया: हा उत्तम रुप्याचा रुपया आहे व तो रुपयाचें नाणें या नांवानें प्रसिद्ध आहे. परंतु जरी तो आज रुपया ह्मणून आहे तरी बाजारांत आज त्याची सोळा आणे किंमत नाहीं; तर बारा चौदा आणे आहे. याचें कारण अधिकारी वर्गानें तो रुपया व्यवहारांत चालवण्याचें बंद केलें आहे. रुपें उत्तम, रुपया किंमतीचा, परंतु आज त्याची व्यवहारांत कांहीं किंमत येत नाहीं व त्यामुळें तो खरा रुपया असूनही कोणी वापरीत नाहीं.

कारण तो रुपया वापरायचा नाहीं अशी रूढी पडली आहे. हें अर्थ-शास्त्राचें उदाहरण जर आमचे शहाण्या पुढाऱ्यांना कळलें आहे म्हणावें, तर ते पुनर्विवाह, बायकांची मुंज, प्रौढविवाह, नौकायान ( परद्वीपगमन ), अभक्ष्यभक्षण वगैरे प्रकार करण्याला तयार होतात हें मोठें आश्चर्य वाटलें पाहिजे. कारण हे प्रकार ( त्यांच्या म्हणण्याप्रमाणें ) पूर्वी वेदकाळीं क्वचित कोठें झाले असतील, परंतु अलीकडे हजार पांचशें वर्षांत ते झाल्याचें प्रसिद्ध नाहीं. अर्थात् ते प्रकार हल्लीं रूढींत ( व्यवहारांत ) नाहींत म्हणून ते प्रकार वरील अर्थशास्त्राचे उदाहरणावरून तरी त्यांनीं करण्याचे बंद करणें वाजवी आहे असें मला वाटतें.

संसाररूपी गाड्याचें स्त्री हें एक मुख्य चाक आहे असें उदाहरण नेहमीं देण्यात येत असतें व तें खरेंही आहे. तशाच प्रकारचें दुसरेंही एक उदाहरण मी येथें देतों.—घराला खांब असतात व त्या नुसत्या खांबावरही इमारत उभी केली तरी चालते. परंतु त्याच खांबावर दुसरें एक लहान उथळें म्हणून जें देण्यात येतें त्यामुळें त्याला शोभा येते व इमारतीला थोडीशी मजबुतीही येते. त्याचप्रमाणें या आमच्या संसाररूपी इमारतीचे उथळ्याचे जागीं पूर्वींचे शास्त्रवेत्त्यांनीं किंवा ईश्वरानें स्त्रियांची योजना केली असावी व त्यामुळेंच या संसाररूपी इमारतीला शोभा व मजबुती आलेली आहे. हल्लीं ज्या पद्धतीचें शिक्षण स्त्रियांना मिळत आहे तें निरुपयोगी आहे व त्यामुळें संसाररूपी इमारतीला मजबुती नाहीं व शोभा नाही हें प्रत्येकाला दिसतेंच आहे. उथळ व तुळई जसें स्वतंत्र नाहीं व त्याचा खांबाशिवाय उपयोगही नाहीं, त्याचप्रमाणें स्त्रिया ज्या अर्थी उथळाच्या ठिकाणीं आहेत त्या अर्थी त्या स्वतंत्रही नाहींत व त्या स्वतंत्र असून संसाररूपी गाड्याला मजबुती व शोभाही नाहीं. म्हणून त्या पुरुषांचे स्वाधीन राहून त्यांनीं संसाररूपी गाडा चालविणेंच श्रेयस्कर व फायद्याचें आहे, व त्यामुळेंच संसाररूपी इमारतीला खरी शोभा व मजबुती येणार आहे. यासाठीं त्यांना जुन्या चालीचें शिक्षण देणें वाजवी आहे.

अलीकडील नवीन राष्ट्रीय शिक्षणापासून मनुष्य किती व्यवहारशून्य बनतो, बापाशीं किती अमर्यादेनें वागतो, जुने रीतरीवाज, धर्म, यांसंबंधानें

त्याला किती तुच्छता वाटत असते याचा थोडासा मासला " फरडा मुत्सद्दी " नांवाचे प्रहसनांत आहे तो येथें देतों. हा वाचला असतां हें शिक्षण किती निरुपयोगी असून त्यामुळें धर्म व नीती यांचा बिघाड कसा होतो हें दिसून येईल.

फरडा मुत्सद्दी—( चिरूट ओढीत टेबलावर पाय टाकून आपल्याशींच ) आपल्याला ईश्वरानें ज्ञान दिलें ह्मणतात—बट व्हेअर इज ही ? आय् कॅन् प्रूव्ह ऑफ् हिज नॉन्–एक्झिस्टन्स ! आणि एकंदर जगताचे इतिहास वाचून पाहिले, तर आपल्या लोकांच्या कांहीं तरी विरुद्ध विलक्षण प्रकार सुरू केल्यावांचून जगात आपला लौकिकच होत नाहीं ! आज तारखेला परमेश्वर सत्तेनें-डॅम् इट. हा कुठून बुवा आमच्या तोडांत येऊन बसला आहे ! आह्मी परवशतेंत आनंदानें दिवस काढीत आहोंत हा एक नेचरनें आमच्यावर मोठाच उपकार केला आहे ! नाहीं तर आमच्या या जनकोबानें प्रत्येक पावलीं, आमच्या श्रीमुखांत फाडदिशी फडकावलीच असती ! हे आले पहा—हातांत तुळशीची परडी आणि दुर्वांचा जुडा घेऊन ! पण त्यांचा उपयोग एखाद्या जनावराला केला, तर तें बिचारें उपकार स्मरून कांहीं तरी उपकार फेडील ! पण हे दगडाचे आणि तांब्याचे गोळे काय करणार ! ( इतक्यात जनार्दनपंत येतात त्यांना पाहून ) या तुह्मी जनकोपंत—नाहीं पण जनकोबा, इट्स् ॲन् ईझी फार्म ! तुह्मी जो हा फुकट वेळ गमवितो, आणि व्यर्थ श्रम करतां, त्यापेक्षां एखादें सार्वजनिक देशकल्याणाचें काम केलेंत, तर शहाणे लोक तुह्मांला " भूमीला भार आणि खायला काळ " अशासारखे रिणायस्वरूपी दगडोबा तरी ह्मणणार नाहींत !

जनार्दनपंत—(मुलाकडे रेखुन पाहून मनांत ) तरी ह्मटलें असें कां आज माझ्या बाळ्याचे कान लांब दिसताहेत !

फ० मु०—आमच्याकडे पहा ना. क्षणभर तरी रिकामपण असायचें होतं ! पैसे मिळवायचा धंदा देखील आमचा घात करतो—पण रिकामपण सांपडण्याबरोबर, जा याच्या घरीं, भेट तिला, दे व्याख्यान, कर उपदेश, धूम सपाटा चालला असतो !

ज०–( पुन्हां मुलाकडे नजर करून मनांत ) हा काय आरशीचे गुण आहे! (आरशी काढून ) नाहीं, याची मानही पण पुढेंच आलेली दिसते!

कारण तो रुपया वापरायचा नाहीं अशी रूढी पडली आहे. हें अर्थशास्त्राचें उदाहरण जर आमचे शहाण्या पुढाऱ्यांना कळलें आहे ह्मणावें, तर ते पुनर्विवाह, नायकांची मुंज, प्रौढविवाह, नौकायान ( परद्वीपगमन ), अभक्ष्यभक्षण वगैरे प्रकार करण्याला तयार होतात हें मोठें आश्चर्य ह्मटलें पाहिजे. कारण हे प्रकार ( त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें ) पूर्वी वेदकाळीं क्वचित कोठें झाले असतील, परंतु अलीकडे हजार पांचशें वर्षांत ते झाल्याचें प्रसिद्ध नाहीं. अर्थात् ते प्रकार हल्लीं रूढींत ( व्यवहारांत ) नाहींत ह्मणून ते प्रकार वरील अर्थशास्त्राचे उदाहरणावरून तरी त्यांनीं करण्याचे बंद करणें वाजवी आहे असें मला वाटतें.

संसाररूपी गाड्याचें स्त्री हें एक मुख्य चाक आहे असें उदाहरण नेहमीं देण्यात येत असतें व तें खरेंही आहे. तशाच प्रकारचें दुसरेंही एक उदाहरण मी येथें देतों.—घराला खांब असतात व त्या नुसत्या खांबावरही इमारत उभी केली तरी चालते. परंतु त्याच खांबावर दुसरें एक लहान उथळें ह्मणून जें देण्यात येतें त्यामुळें त्याला शोभा येते व इमारतीला थोडीशी मजबुतीही येते. त्याचप्रमाणें या आमच्या संसाररूपी इमारतीचे उथळ्याचे जागीं पूर्वीचे शास्त्रवेत्त्यांनीं किंवा ईश्वरानें स्त्रियांची योजना केली असावी व त्यामुळेंच या संसाररूपी इमारतीला शोभा व मजबुती आलेली आहे. हल्लीं ज्या पद्धतीचें शिक्षण स्त्रियांना मिळत आहे तें निरुपयोगी आहे व त्यामुळें संसाररूपी इमारतीला मजबुती नाहीं व शोभा नाही हें प्रत्येकाला दिसतेंच आहे. उथळ व तुळई जसें स्वतंत्र नाहीं व त्याचा खांबाशिवाय उपयोगही नाहीं, त्याचप्रमाणें स्त्रिया ज्या अर्थी उथळाच्या ठिकाणीं आहेत त्या अर्थी त्या स्वतंत्रही नाहींत व त्या स्वतंत्र असून संसाररूपी गाड्याला मजबुती व शोभाही नाहीं. ह्मणून त्या पुरुषांचे स्वाधीन राहून त्यांनीं संसाररूपी गाडा चालविणेंच श्रेयस्कर व फायद्याचें आहे, व त्यामुळेंच संसाररूपी इमारतीला खरी शोभा व मजबुती येणार आहे. यासाठीं त्यांना जुन्या चालीचें शिक्षण देणें वाजवी आहे.

अलीकडील नवीन राष्ट्रीय शिक्षणापासून मनुष्य किती व्यवहारशून्य बनतो, बापाशीं किती अमर्यादेनें वागतो, जुने रीतरीवाज, धर्म, यांसंबंधानें

त्याला किती तुच्छता वाटत असते याचा थोडासा मासला " फरडा मुत्सद्दी " नांवाचे प्रहसनांत आहे तो येथें देतों. हा वाचला असतां हें शिक्षण किती निरुपयोगी असून त्यामुळें धर्म व नीती यांचा बिघाड कसा होतो हें दिसून येईल.

**फरडा मुत्सद्दी**—( चिरूट ओढीत टेबलावर पाय टाकून आपल्याशींच ) आपल्याला ईश्वरानें ज्ञान दिलें ह्मणतात—बट व्हेअर इज ही ? आय् क्यान् प्रूव्ह ऑफ् हिज नॉन्-एक्झिस्टन्स ! आणि एकंदर जगताचे इतिहास वाचून पाहिले, तर आपल्या लोकांच्या कांहीं तरी विरुद्ध विलक्षण प्रकार सुरू केल्यावांचून जगात आपला लौकिकच होत नाहीं ! आज तारखेला परमेश्वर सत्तेनें-ड्याम् इट, हा कुठून बुवा आमच्या तोडांत येऊन बसला आहे ! आह्मी परवशतेंत आनंदानें दिवस काढीत आहोंत हा एक नेचरनें आमच्यावर मोठाच उपकार केला आहे ! नाहीं तर आमच्या या जनकोबानें प्रत्येक पावलीं, आमच्या श्रीमुखांत फाडदिशी फडकावलीच असती ! हे आले पहा—हातांत तुळशीची परडी आणि दुर्वांचा जुडा घेऊन ! पण त्यांचा उपयोग एखाद्या जनावराला केला, तर तें बिचारें उपकार स्मरून कांहीं तरी उपकार फेडील ! पण हे दगडाचे आणि तांब्याचे गोळे काय करणार ! ( इतक्यांत जनार्दनपंत येतात त्यांना पाहून ) या तुह्मी जनकोपंत—नाहीं पण जनकोबा, इट्स् ऍन् ईझी फार्म ! तुह्मी जो हा फुकट वेळ गमवितो, आणि व्यर्थ श्रम करतां, त्यापेक्षां एखादें सार्वजनिक देशकल्याणाचें काम केलेंत, तर शहाणे लोक तुह्मांला " भूमीला भार आणि खायला काळ " अशासारखे रिणायस्वरूपी दगडोबा तरी ह्म[illegible]

**जनार्दनपंत**—(मुलाकडे [illegible] टलें असें का[illegible] आज माझ्या बाळ्याचे कान [illegible]

**फ० मु०**—आमच्याक[illegible] होतं ! पैसे मिळवायचा धं[illegible] कामपण सांपडण्याबरोब[illegible] कर उपदेश, धूम सप[illegible]

**ज०**—( पुन्हां [illegible] आहे ! (आरशी क[illegible]

फ० मु०—मिस्तर जनको, तुमच्यानें ह्मातारपणीं आमच्यासारख्यां आतां तरतरितपणाचीं कामें व्हायचीं नाहींत, हे आह्मी समजतों, पण बसल्या बसल्या घरांतल्या व आसपासच्या बायकांना तरी शिकवून, चिथावून—आह्मीं नवऱ्याच्या ताब्यांत दास्यत्वाप्रमाणें नाहीं रहाणार, आमचा बर्थराइट ह्मणजे केंसांचा हक्क नेचरनें दिला आहे, त्याची दुष्ट पुरुषांच्या क्रूरत्वानें आह्मी पायमल्ली करूं नाहीं देणार, आह्मीं विवाह व पुनर्विवाह आपल्या खुषीनें पाहिजे तेव्हां, आणि पाहिजे त्या मन मिळालेल्या पुरुषाबरोबर करणार, अशा अशा विचारांची त्यांच्या मनांत प्रेरणा करून एकदम पोलिटिकल ॲजिटेशन तर सुरू कराल !

ज०—( मनांत ) नाहीं—पण बाळ्याचे हात देखील आतां पायासारखे दिसूं लागले !

फ०मु०—नाहीं पण मिस्तर जनको—तुह्मी असा मनांत विचार करा, कीं देशाची, आणि त्यांतील सर्व पुरुषांची आणि स्त्रियांची सर्व बाजूंनीं सुधारणा करण्याचा आह्मीच कां मक्ता घेतला आहे ! धर्माची, ह्मणाले सुधारणा आह्मींच करा ! आचाराची, आह्मीच ! शतकऱ्यांची, आह्मींच ! खाण्यापिण्याची, आह्मीच ! स्त्रियांची, तीही पण आह्मींच !!!

ज० ( मनांत ) हा रांडलेकाच्या !—आतां तर याला लांब आणि गोंडस मोठें झुबकेदार शेंपूट दिसायला लागलें !!!

फ० मु०—(दांत ओंठ खाऊन ) अहो पण बाबासाहेब ! ( चपापून मनांत ) बरें झालें या वेळेस येथें कुणी परका नाहीं हें ! नाहीं तर आह्मीं यांना "बाबा" ह्मणून हांक मारायची आणि दुसऱ्यानें हें असलें चिन्ह पाहून आश्चर्य करून विचारायचें तुह्मी असे * * * आणि हे कां तुमचे वडील ! खालींच मान घालायची वेळ होती कीं नाहीं ! ( मोठ्यानें ) ह्मटलें आंत जाऊन कांहीं औषध घ्या—उगीच खोकत खो-खो-खो नका करीत बसूं येथें—या वर्तमानपत्रांत आमच्याविषयीं काय मजकूर आज आला आहे तो वाचूं द्या आह्मांला !

ज०—तरी ह्मटलें, माझा मीच मी आहे, कीं मी आणखी कुणी दुसरा आहे?

फ० मु०—हो हो तुमचे तुह्मीं तुह्मींच आहांत ! आहांत वरं कां तुह्मी ?

ज०—नाहीं, मला वाटलें होतें, कीं तूं आणखी दुसरा कोणाजवळ बोलतो आहेससा ?

फ० मु—आणखी कोणाजवळ? आतां हा भूतचेष्टांवर विश्वास ठेवण्याचा सोकावा शकत नाहीं ? अहो तुमचेच तुह्मीं, आणि आमचेच आह्मीं असें दोघेच या ठिकाणीं असतां " नाहीं, मला वाटलें होतें, कीं तूं आणखी दुसरा कोणाजवळ बोलतो आहेससा " असें बोलायला जनकोबा तुमच्या या वयाला शरम कशी वाटत नाहीं ?

ज०—खरें बाळ्या, असला अमर्याद व पचकळ विनोद माझ्या स्वप्नांत देखील कधीं आला नाहीं ! मुलगा विद्या शिकून तारा झाला खरा ! आतां तूं उभय कुलांना बत्ती लावशील खरी ! वाहवारे बाळ्या—बाळ्या पण बाळ्या खरा ! माझा बाळ्या ! वारे !!!

फ० मु०—बस बस, पुरे करा असले हलकट शब्द बोलावयाचे ! डिअर कम्स् माय आनर्ड फ्रेंड् मिस्तर वामनराव—आणि तुह्मांला मी साफ सांगतों, कीं हल्लींच्या आमच्या थोरावलेल्या स्थितींत तुह्मीं कांहीं आह्मांला आमचे बाप असे शोभत नाहीं ? याजकरतां एखाद्या खेडेगांवांत जाऊन रहा आतां, आणि आहेच तुह्माला संवय घोत्रें बडवायाची, तीं कोणाचीं तरी बडवून आपल्या पोटांत कांटे भरा - ह्मणजे आह्माला देशाला आळशी केल्याचें पातक तरी लागणार नाहीं ? हं, चला घरांत, जा येथून कसें ?

## क्षत्रिय.

शौर्य, तेज, धैर्य, दक्षता, युद्धामध्यें पलायन न करणें, दातृत्व व ईश्वरभाव हे क्षत्रियांचे स्वाभाविक गुण गीतेमध्यें सांगितले आहेत.

मनुष्य प्राण्यांत चार वर्ण आहेत ह्मणून मागें सांगितलें आहे व त्यांपैकीं ब्राह्मण वर्णासंबंधानें पूर्वीं माझे अल्प मतिप्रमाणें थोडेसें लिहिलें आहे. व त्यांत ब्राह्मण वर्णानें आपला आचार व धर्म पाळावा असें सांगितलें आहे. कलियुगांत या चार वर्णांपैकीं ब्राह्मण व शूद्र वर्णच प्रमुखत्वानें कायम आहेत असें स्पष्ट दिसत आहे. त्याचे खालोखाल वैश्य वर्ण आहे. व क्षत्रिय वर्ण अजीबात नाहीं असें नाहीं, परंतु तो बीज रूपानें आहे व

तो कोठें आहे हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. क्षत्रियाचें बीज कायम रहावें ह्मणून यदुकुलाचा संहार होण्यापूर्वी त्या कुलांतील एक दोन पुरूष तपश्चर्या करण्याकरतां श्रीकृष्णांनीं पाठवून दिल्याचें इतिहास-प्रसिद्ध आहे, व वर सांगितलेलें हेंच क्षत्रिय बीज असावें असें वाटतें.

क्षत्रियवर्गासंबंधानें पूर्णपणें लिहिण्याला आह्मांला कांहीं मार्ग नाहीं व पूर्वीचे पुराण ग्रंथ व इतिहास यांवरून आह्मांला त्यांची खरी स्थिति उपलब्ध नाहीं. परंतु गेल्या सात आठशें वर्षांपासून उत्तर हिंदुस्थानांतील मेवाड, चितोड, जोधपुर, जयपुर इत्यादि संस्थानांचे अधिपति रजपूत आहेत व त्यांसच क्षत्रिय अशी संज्ञा त्या काळापासून चालत आलेली आहे. परंतु रजपूत ह्याचा अर्थ क्षत्रिय असा मुळींच नाहीं गागाभट्टाचा वंशज जो कमलाकरभट यानें "रजपूत" याची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे व तीवरून रजपूत हे क्षत्रिय नाहींत असें उघड दिसतें. "शूद्रजातीय स्त्रीचे ठिकाणीं क्षत्रियापासून जो पुरुष उत्पन्न होतो त्याची जाति उग्र ही होय. युद्ध व शस्त्रास्त्रें हीं याच्या उपजीविकेचीं साधनें होत. शस्त्रास्त्रांचा न्यास करण्याचें कामीं हा कुशल असतो व युद्धामध्यें चतुर असतो. वर निर्दिष्ट केलेल्या कर्मांनीं जर त्याची उपजीविका होत नसेल तर त्यानें शूद्र धर्माचें पालन करावें. ह्यालाच रजपुत असें ह्मणतात" युद्ध व शस्त्रास्त्रें हीं ज्या अर्थीं रजपुताचीं उपजीविकेचीं साधनें सांगितलीं आहेत, व त्यामुळें उत्तर हिंदुस्थानांतील रजपुत जरी राजे झाले असले, तरी ते क्षत्रिय या संज्ञेला मुळींच योग्य नाहींत. क्षत्रिय जातीचें बीज असल्याशिवाय खरी क्षत्रिय जाति असूं शकत नाहीं. खरे क्षत्रिय कोठें आहेत याचा पत्ता नाहीं व असे क्षत्रिय दक्षिण महाराष्ट्रांत तर मुळींच नाहींत. वर्णव्यवस्था उत्पत्तिसिद्ध आहे, ह्मणूनच क्षत्रियांचीं कर्में कोणी इतर जातीनें केलीं, तरी ती जात क्षत्रिय असूं शकणार नाहीं. कर्मावरून जर वर्णव्यवस्था मानली, तर आज वाटेल तो मनुष्य ब्राह्मण अगर क्षत्रिय होऊं शकेल. फक्त ब्राह्मणालाच प्रसंग-विशेषीं क्षत्रियांचीं कर्में करण्याचा अधिकार वेदानें दिलेला आहे, व ब्राह्मणांनीं क्षत्रियांचीं कर्में केल्याचीं इतिहासांत पुष्कळ उदाहरणें आहेत. परंतु ब्राह्मणांनीं कधीं आपल्याला क्षत्रिय ह्मणवून घेतलेलें नाहीं.

खरे क्षत्रिय हल्लीं नाहींत त्या अर्थी त्यांचे संबंधानें येथें जास्त लिहिण्याचें कांहीं कारण नाहीं. अलिकडे वेदोक्ताचें बंड बरेंच माजलें आहे व जो तो ब्राम्हणेतर आपल्या घरीं वेदोक्त कर्मे करवून घेण्याबद्दल खटपट करीत आहे व याबरोबरच कांहीं संस्थानिकही आपल्याला क्षत्रिय ह्मणवून घेण्याबद्दल खटपटी करीत आहेत. सबब क्षत्रियासंबंधानें विशेष स्पष्टीकरण पुढें करण्यांत येईल. रजपुतांप्रमाणेंच कायस्थ, चांद्रसेनी, लोहाणे, भाट, भिल्ल व कोळी या जातींना बरेच वर्षांपासून क्षत्रिय ह्मणण्याचा रिवाज पडलेला आहे व तो त्यांचे पुरता मी गृहीत धरतों.

## वैश्य.

ब्राह्मण व क्षत्रिय या दोन वर्णांसबंधानें मागें थोडासा विचार केला. आतां वैश्य वर्णासंबंधानें थोडेंसें लिहावयाचें आहे. ज्याप्रमाणें क्षत्रियवर्ण कलियुगांत नाहीं असें पूर्वी सांगितलें आहे त्याचप्रमाणें वैश्य वर्णाचीही कांहीं अंशीं स्थिति आहे. शेतकी ( कृषि ), गोरक्षण ( गोरक्ष्य ) व व्यापार ( वाणिज्य ) हीं तीन मुख्य कर्मे वैश्यवर्णाला सांगितलीं आहेत. व याशिवाय अध्ययन, दान व याग हीं सुद्धां त्यांना कर्मे सांगितलीं आहेत. हीं तीन कर्मे ब्राह्मण व क्षत्रिय यांनाहीं सांगितलेलीं आहेत. हीं कर्मे ठिकठिकाणीं अजून ब्राम्हणवर्गाकडून होत आहेत व वैदिक मंत्रांनीं त्यांच्यांत उपनयन संस्कार अजून होत आहेत व त्यांमुळें त्यांना वेदाध्ययन व अध्यापन करण्याला अधिकार आहे. जातीचे ब्राम्हण असे हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत, परंतु जातीनें ( जन्मतः ) क्षत्रिय असा हिंदुस्थानांत एकही नाहीं. अलीकडे त्यांच्यांत वैदिक मंत्रांनीं उपनयन होण्याची परंपरा कोठेंही कायम नाहीं. म्हणून क्षत्रिय वर्णाप्रमाणें वैश्यवर्णही हल्लीं हिंदुस्थानांत नाहींच म्हटलें तरी चालेल. वैश्य जातीचे जे आपणाला हल्लीं म्हणवीत आहेत, त्यांपैकीं कांहीं व्यापार करणारे ( वाणिज्य ), कांहीं गिरणीवाले, कांहीं नोकऱ्या करणारे असे आहेत. ब्राम्हण व शूद्र यांनीं देखील वैश्यत्व पतकरिलें आहे. परंतु शेतकी व गोरक्षण हे करणारे कोणीही दिसत नाहींत. तसेंच अध्ययन, दान व याग हीं कर्मेंही या जातींत कोणी करणारे दिसत नाहींत.

## शूद्र.

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांची शूद्रानें सेवा करावी असें गीतेतील एका श्लोकांत सांगितलें आहे. तिन्हीं वर्णांनीं आपला जातिधर्म, कुलधर्म व देशधर्म सोडला, त्याचप्रमाणें शूद्रानेंही तीन वर्णांतील लोकांची सेवा करून राहण्याचा जो धर्म तो सोडून दिला आहे, एवढेंच नाहीं तर द्विजसेवा हें जें त्याचें मुख्य कर्म तें त्यांच्यांतील कांहीं आधुनिक पुढारी वर्ग अजीबात विसरला आहे व त्यांचें बदली सर्व ब्राह्मणांचा द्वेष, अपमान व निंदा अशा सारखीं कृत्यें करण्यास तो तयार झाला आहे. यामुळेंच हिंदुस्थानांतील प्रजेला वाईट दिवस आले आहेत असें वाटतें. ज्या वेळीं प्रत्येकजण आपला जातिधर्म, कुलधर्म, व देशधर्म यांचे अनुरोधानें वागूं लागेल, तेव्हांच हिंदुस्थानांतील प्रजेला चांगले दिवस येतील व तिचा अभ्युदय होईल.

शूद्र वर्ण हा चवथा वर्ण आहे व या शूद्रांत पहिल्या तीन वर्णांशिवाय सर्व तऱ्हेचे लोक येतात. या शूद्रांत कांहीं अगदीं नीच जाती अशा मानलेल्या आहेत, त्या भंगी, चांभार, महार, मांग, बुरुड वगैरे होत. या लोकांना कोणीही स्पर्शसुद्धां करीत नाहीं व स्पर्श झाला असतां विटाळ झाला असें समजून साधारणपणें सचैल स्नान करण्याचा आतांपर्यंत प्रघात आहे. यांना अति शूद्र असें ह्मणतात. व बाकीच्या इतर लोकांत कमी अधिक दर्ज्याचे लोक आहेत. या लोकांचा तिन्हीं वर्णांतील लोकांशी नेहमीं व्यवहारांत संबंध येत असल्यामुळें तिच्या संसर्गाला दोष नाहीं असें शास्त्रानें व रूढीनें ठरविलें आहे, व तें आज हजारों वर्षें चालत आहे.

या शूद्रांतच मराठे हे मोडतात, व हे आपल्याला शिवाजी व आपण एक जातीचे असें समजतात व ह्मणून आपण क्षात्रिय आहों असें ते ह्मणतात. परंतु शिवाजीचा ज्या रजपुत घराण्याशीं संबंध लावून दिला आहे, ते रजपुत खरे क्षात्रिय नाहींत असें मागें क्षात्रियासंबंधानें लिहितांना सांगितलें आहे. तेव्हां शिवाजी महाराज हेच जर क्षत्रिय ठरत नाहींत, तर त्यांच्या जातीचे ह्मणवणारे इतर मराठे लोक तरी कसे क्षत्रिय होणार तें समजत नाहीं. जर मराठे तेवढे सर्व क्षत्रिय ह्मणावयाचे तर मग शूद्र कोणाला ह्मणावें हा प्रश्न येतो. परंतु हल्लीं प्रसिद्ध असणारीं मराठ्यांचीं जीं

कुळें आहेत त्यांत बरेच वर्षापासून तिसऱ्या पिढीला खर्चीचा खासा. झाल्याबद्दलचीं उदाहरणें बरींच आहेत. व यांच्या बरोबर, अलीकडील, क्षत्रिय मराठे ह्मणविणारे जातीचा रोटी व बेटी व्यवहार सुरू असल्याचें प्रत्यक्ष दिसत आहे. हीं कुळें पाहिलीं असतां त्यांचे शिवाय शुद्ध शूद्र ह्मणुन कोणी राहिल असें मला वाटत नाहीं. या मराठे कुळांचीं कांहीं नांवें येथें देतों त्यांवरून वाचकांची खात्री होईल—आगलावे, कंक, कदम, काकडे, कांबळे, केसकर, खोले, गायकवाड, गिरजे, गुजाळ, घोरपडे, घोलप, चव्हाण, जगताप, जगदाळे, जाधव, डफळे, दाभाडे, ढमढेरे, निकम, भोंसले, महाडीक, मालप, मालसुरे, मिसाळ, राऊत, वाघ, वाघमारे, शिंदे, विचारे, वेळणकर, शिरके, सावंत, सुपेकर सुरवशी वगैरे. हीं व यांशिवाय हीं इतर कुळें आहेत. या सर्वांना जर क्षत्रिय असें मानलें, तर मग शूद्र तरी कोणास ह्मणावें ? अर्थात् शूद्र नाहींच असें ह्मणावें लागेल. वरील कुळांशिवाय साळी, कोष्टी, सुतार वगैरे अनेक जाति आहेत व त्यांपैकीं सुतार वगैरे कित्येक तर वरच्यांहून श्रेष्ठ मानल्यांत येत आहेत. गुरव वगैरे कित्येक जातींत उपनयन होत असतें व मराठ्यांना क्षत्रिय मानल्यास गुरव वगैरेंना मराठ्यांहूनही उच्च प्रतीचें मानावें लागेल. जर चार वर्ण मानायचे, तर शूद्रवर्ण मानणें जरूर आहे व तो शूद्र वर्ण पाहूं गेलें तर मराठे ह्मणून ह्मणवीत असलेले शूद्र आहेत असें ठरतें.

आपले आडनांवावरून आपण क्षत्रिय आहों असें समजणेंही अयोग्य आहे. कारण तसें झालें तर "सुरवशी" हे सूर्यवंशी ठरतील; यादव हे यदुकुलावतंस होतील; साळुंखे हे चालुक्य ठरणार व चव्हाण वगैरे शूद्रदेखील आपणाला क्षत्रिय ठरवणार, एवढेंच नाहीं तर रामोशीसुद्धां आपण रामवंशी आहों असें ह्मणणार. सुरवशी हें आडनांव अलीकडे व्यभिचारजन्य संततीस देण्याची मराठ्यांत चाल आहे, व कित्येक सुरवशांस तर आपले बापाचें नांव मुळींच माहित नसल्यामुळें त्यांचे नांवाचे पुढें आईचें नांव लावण्यांत येत असतें. यादव कुळाचे मराठ्यांत तर शास्त्रविरुद्ध चाली अबाधित चालत आहेत. शिंदे, जाधव, भोंसले व घोरपडे हीं नांवें देखील व्याभिचारजन्य संततीस देण्याची पुष्कळ ठिकाणीं

वहिवाट आहे व यामुळें अस्सल मराठा कोणाला ह्मणावें याची मोठी पंचाईत पडत आहे. जो पूर्वी गर्द्य कुलांतील शूद्र ह्मणून दिसत असे, तोच जास्त पैसे मिळवूं लागून भपकेबाज करूं लागला कीं भोसले होऊं शकतो व मराठ्यांनीं ठेवलेल्या नाइकिणींचीं गोरीं गोमटीं अथवा अक्कड-बाज व अलीकडील विद्वत्तेंत निष्णात झालेली प्रजा कांहीं कांहीं ठिकाणीं मराठ्यांत पुढारी होऊं पहात आहेत. सारांश, आडनांवे हीं अपभ्रंश आहेत असें समजून जर त्यांचा क्षत्रियाशीं संबंध लावला, तर वर दाखविल्याप्रमाणें घोटाळा होईल.

आतां मराठ्यांचें म्हणण्याप्रमाणें सर्व मराठे क्षत्रिय आहेत असें क्षणभर मानलें तर त्यांच्यांत क्षत्रियाचे नित्य धर्म चालवणारे किती वंश निघतील ? तर एकही वंश क्षत्रियाचे नित्य धर्मानें चालणारा नाहीं असें उत्तर मिळेल.

मराठ्यांप्रमाणेंच गायकवाड सरकार व कोल्हापुर सरकार यांचेंमध्यें-हीं आपण क्षत्रिय आहों व म्हणून आपलेकडे ब्राम्हणांनीं वेदोक्त कर्मे केलीं पाहिजेत अशाबद्दल आज बरेच दिवसांपासून रण माजलें आहे. ज्या शिवछत्रपतींचे वंशज हे आपणाला म्हणतात, ते शिवछत्रपती तर खरे क्षत्रिय नव्हते हें मागें सांगितलें आहे. परंतु त्यावेळीं शिवरायांनीं महाराष्ट्रराज्य संस्थापना केली, सर्व महाराष्ट्रीयांना मुसलमानांचे जाचां-तून सोडविलें, गोब्राम्हणांचें उत्तम प्रकारें संरक्षण केलें, एवढ्या कारणां-करतां व सर्व लोकांना आपला कोणीं तरी राजा असावा व त्याचे छत्राखालीं आपण असावें अशी इच्छा झाली व त्यामुळेंच त्यांनीं या-वेळीं शिवछत्रपतीला गागाभट्टाकडून राज्याभिषेक करवून राजा केलें. व यावेळीं असें करणें वाजवीही होतें. जे संस्थानिक किंवा मराठे आ-पल्याला क्षत्रिय ह्मणवण्याचा अट्टाहास घेतात, त्यांच्या पैकीं किती ज-णांचे हातून शिवाजी महाराजांप्रमाणें कर्मे होत आहेत? किंवा त्यांचे बापआज्यांनीं केल्याचें त्यांचे किंवा इतरांचें ऐकिवांत आहे ? हल्लींचे गायकवाड, शिंदे, होळकर हे ज्या पूर्वीच्या पेशवाईतील पिलाजी गाय-कवाड, दौलतराव शिंदे, मल्हारराव होळकर यांचे वंशज आहेत त्यांनीं पूर्वी शौर्याचीं कामें केलीं असूनही त्यांनी कधीं आपणाला क्षत्रिय ह्म-

णविण्याचा किंवा आपले घरीं वेदोक्त कर्में करविण्याबद्दल हट्ट घेतला असल्याचें व ब्राह्मणांना दिलेलीं इनामें, जहागिरी वगैरे जप्त केल्याचा इतिहासांत कोठेंही दाखला नाहीं. तर हल्लींच्या गायकवाड, कोल्हापुरकर वगैरेनीं आपल्या पूर्वजाप्रमाणें हल्लीं एकही शौर्याचें कृत्य करून आपलें राज्य वाढविल्याचें दिसत नाहीं. इतकेंच नव्हे तर उलट प्रस्तुत काळीं बडोद्याच्या गादीवर सयाजीराव येण्याचे पूर्वी गोब्राह्मण प्रतिपालक अशी ज्या गायकवाडी घराण्याला उपमा लोक देत असत त्याचे विरुद्ध या महाराजांचे कारकिर्दींत गोवध आपले राज्यांत करण्यास परवानगी यांनी दिल्याचें एकिवांत येतें. इतकेंच नव्हे तर त्या गोवधाप्रीत्यर्थ सहा आणे करही ह्यानी ठेविला आहे व ब्राह्मणलोक आपले घरीं वेदोक्तकर्में करीत नाहींत ह्मणून यांचे पूर्वजांनीं दिलेलीं इनामें जप्त करीत आहेत व ब्राह्मणांचा द्वेष करीत आहेत. तर त्यानीं आपल्याला कोणत्या आधारावर क्षत्रिय ह्मणविण्याचा हट्ट घ्यावा ? हें मला समजत नाहीं. सारांश, पूर्वजांच्या विरुद्ध जर ह्याचें आचरण होत आहे तर ह्यांना क्षत्रिय कसें म्हणावें ? वांईच्या धर्मांत " अर्जुनाचें म्हणणें २ " या सदराखालीं सदर विषयासंबंधानें चांगला उहापोह केला आहे त्याचा सारांश या ठिकाणीं घेऊन हा विषय पुरा करतों. " क्षत्रियाला शौर्य हें कर्म प्रथम सांगितलें आहे. क्षत्रिय ह्मणविणाऱ्यापैकीं किंवा क्षत्रिय ह्मणवूं पहाणाऱ्या मराठ्यां पैकीं शौर्य गाजविणारा पुरुष हजारांत एखादा तरी आहे काय ? श्रीमंत सयाजीमहाराज गायकवाड ह्यांनीं आपल्या राज्यांत वेदोक्ताचें बंड माजविलेलें आहे. वस्तुतः पाहूं गेलें असतां हे शूद्र आहेत इतकेंच नव्हे, परंतु देशमुख, पिसाळ, धुमाळ, घोरपडे, इत्यादि जे मोठे कुलीन मराठे आहेत, त्यांच्याप्रमाणें तरी हे उच्च मानले जात आहेत किंवा नाहीं, हा प्रश्नच आहे. कारण, कोल्हापुरकर भोंसल्यांच्या घराण्यांतलि पुरुष गायकवाडांशीं मोकळ्या मनानें अन्नव्यवहार करीत नसत असें श्रीमंत महाराणी साहेब जमनाबाईनीं प्रत्यक्ष आह्मांला सांगितलेलें आहे. सारांश, श्रीमंत सयाजी महाराज गायकवाड निवळ शूद्र आहेत, व प्रत्येक दहा वर्षांनीं जी खानेसुमारी होत असते, त्यावेळीं ह्यांनीं आपली जात खानेसुमारीच्या पटांत

नमूद होण्याकरता शूद्र ह्मणून सांगितली असल्याचें आमच्या ऐकण्यांत आहे. मग, खरे खरे जर हे शूद्र आहेत, तर ह्यांना वेदाचा अधिकार असणार कोठून ! आणि वेदाचा जर अधिकार नाहीं तर वेदोक्ताचें बंड गाजविणें ह्मणजे निवळ अन्याय नव्हे काय ? वेदोक्ताचें खूळ माजवून श्रीमंत सयाजी महाराज गायकवाडांनीं राज्यावर आल्यापासून लोकांचीं उत्पन्नें जप्त करणें, दीन दुबळ्या प्रजेशीं लढाई करणे, ज्यांचीं शिरें राज्य संपादण्याकरतां खर्च झालीं आहेत अशांच्या जहागिरी अथवा इनामें नाहींशीं करणें, देवस्थानाकडील उत्पन्न कमी करणें, संस्थानांतील तोफा फोडून टाकणें, स्वारांचें सैन्य नाहींसें करणें, वेदशाळा बंद करणें, वगैरे कृत्यें केलीं आहेत व या कृत्यांना शौर्य हें नांव कोणी देणार नाहीं. फाटके तुटके साहेबही गरम होतील ह्मणून हव्या त्या रीतीनें मान वांकविणारे सांप्रतचे क्षत्रिय मराठे किती तेजस्वी आहेत हें उघड दिसत आहे. धृति ह्मणजे धैर्य. पोलिटिकल एजंट, रेसिडेंट इत्यादि साहेबांकडून येणाऱ्या यादीप्रमाणें निमूटपणें वागणाऱ्या, परंतु क्षत्रिय ह्मणून वेदोक्ताचा ध्यास घेणाऱ्या ह्या मराठ्यांच्या अंगीं धैर्य कितपत आहे हें उघडच दिसत आहे. व यांचे वर्तनांत आपलेपणा व स्वधर्म किती वसत आहे हें खालील उदाहरणांवरून वाचकांस कळून येईल. आमचे श्रीमंत सयाजीराव महाराज हे स्वतः आपण होऊन वर्षाचीं वर्षें विलायतेंत चैनीनें घालवीत आहेत असें असूनही इतर क्षत्रिय मराठा ह्मणविणारा वर्ग यांस आपले जातींत घेत आहे. तेव्हां आतां आमचे दयाळू इंग्रज सरकारांनीं आमचे बादशाहा सातवे एडवर्डमहाराज यांचे राज्यारोहणाचे वेळीं त्यांना आमंत्रण केलें हें कांहीं अयोग्य केलें असें नाहीं कारण पूर्वीं महाराणी व्हिक्टोरिया यांचें राज्या रोहणाचे वेळीं ही इकडील संस्थानिकांना आमंत्रणें गेलीं होतीं, परंतु तीं अगत्याचीं नव्हतीं. कारण ते हिंदुधर्माचे असल्यामुळें ते आपले देशांत येणार नाहींत असें त्यांना वाटत होतें परंतु अलीकडे ज्या अर्थी गायकवाडासारखे संस्थानिक जर हवा खाण्यासाठीं विलायतेंत जातात व तेथें वर्ष दोन वर्षें रहतात, व त्यांचेंच अनुकरण इतर संस्थानिकही करतात हें जर राजेसाहेबांना दिसतें, तर त्यांना हे संस्थानिक स्वधर्माप्रमाणें वागत नाहींत असें वाटत असलें पाहिजे व त्यामुळेंच त्यांनीं संस्थानि-

कांना राज्यारोहणाचे वेळीं आमंत्रणें केलीं व तीं त्यांनीं मान्य केलीं. ककु जेथपुरचे महाराज यांना त्यावेळीं जाणें अगत्यच झालें तेव्हां त्यांना आपले धर्माचे संरक्षणासाठीं निराळी आगबोट करून पाण्याची वगैरे सुद्धां व्यवस्था करून जाणें भाग पडलें. अशी जर धर्माची व्यवस्था आहे व गायकवाड वगैरे विलायतेंत गेलेल्या राजांशीं जर गरीब मराठे लोक संबंध ठेवतात तर तें धर्माला अगदीं अयोग्य आहे. कारण धर्माला गरीब व श्रीमंत हे सारखेच आहेत. तेव्हां धर्मरक्षणासाठीं ह्मणून त्यांनीं अशा लोकांशीं मुळींच संबंध ठेऊं नये अर्थात अशा लोकांना जाति बहिष्कार घालावा हेंच श्रेयस्कर आहे. ज्यांच्या पूर्वजांनीं स्वराज्य व स्वधर्म यासाठीं जी यांचे पूर्वजांस मदत केली होती त्यांचे मोबदल्यांत दिलेल्या देणग्या कांहीं तरी कारणांनीं यांनीं नाहींशा करून उत्पन्न वाढविण्याकडे लक्ष्य देत असलेल्या क्षत्रिय ह्मणविणाऱ्या महाराजांच्या अंगीं दान हा गुण कितपत आहे ह्याची वाटाघाट करण्याचें प्रयोजनच दिसत नाहीं. ब्राह्मणांना गालिप्रदान, फांसे टाकून सोंगट्यांना दान, इत्यादि प्रकाराशिवाय दानधर्म करणारे संस्थानिक सांप्रत कोण असतील ते असोत. सारांश, क्षत्रिय जातीला जीं कर्में विहित आहेत, तीं करणारा सर्व भरतखंडांत जर आज कोणीच नाहीं, तर क्षत्रिय जाति हिंदुस्थानांत आहे असें ह्मणण्यांत अर्थ तो काय ? " हल्लींच्या कोल्हापुरकर वगैरे संस्थानिकांना जर क्षत्रिय ह्मणवून घेण्याची हौस व इच्छा असेल तर त्यांनीं क्षत्रियांना सांगितलेलीं कर्में यथासांग करावीं ह्मणजे त्यांना लोक आपण होऊन क्षत्रिय ह्मणूं लागतील असें मला वाटतें. अलीकडे बहुतेक लोकांना कर्मावरून जाति ठरविण्याची बुद्धि होऊं लागली आहे व याप्रमाणें ते बोलूंही लागले आहेत. परंतु या त्यांचे ह्मणण्याप्रमाणें जर घटकाभर कबूल केलें तर शूद्रापैकीं भंगी एक जात आहे. व या जातीचा धंदा मल नेणें व शौचकूप साफ करणें वगैरे आहे. या जातीचा एकादा मनुष्य जर उत्तम मराठ्यासारखें आचरण करूं लागला तर त्याचे बरोबर क्षत्रिय ह्मणविणारे मराठे सर्व प्रकारचा व्यवहार करण्याला तयार आहेत काय ? जर तयार असून ते त्याच्याशीं प्रत्यक्ष व्यवहार करूं लागतील तर मग कर्मावरून जाति ठरवावी हें त्यांचें ह्मणणें कबुल करतां येईल. परंतु हें जर त्यांना कबूल नसेल तर मग पूर्वीच्या लोकांनीं जे जातिभेद ठरविले आहेत

तेच त्यांनीं मानले पाहिजेत. व त्याप्रमाणें सर्व लोक आचरण करूं लागले असतां देशाचें कल्याण होईल असें मला वाटतें. अलीकडे कै. रानडे प्रभृतींनीं सर्वत्र एकी झाली पाहिजे ह्मणून जी खटपट चालविली आहे व त्या खटपटीचें मूळ काय तें जातिभेद मोडून सर्व जाति एक कराव्या असें आहे व याचें थोडेंसें दिग्दर्शन चित्रपटांत केलें आहे. त्यावरून एकी न होतां उलट सर्व जातींत एकमेकांविषयीं वैमनस्य होत आहे, व त्यामुळेंच प्रस्तुतची वाईट स्थिति प्राप्त झाली आहे. ही स्थिति दूर होण्यासाठीं सर्वांनीं जातिभेद कायम ठेवून आपापले धर्माप्रमाणें वागावें ह्मणजे सर्वांत ऐक्य होऊन सर्वांचें कल्याण होईल असें मला वाटतें.

## राज्य.

गेल्या सात आठशें वर्षांचा इतिहास पाहिला असतां महाराष्ट्रावर किंबहुना हिंदुस्थान देशावर चार राज्यकर्ते झाले असल्याचें दिसून येतें. त्यांपैकीं अगदीं प्रथमचे राज्यकर्ते ह्मणजे मुसलमान व पोर्तुगीज होत. त्यानंतरचे मराठे हे होत. तिसरे मराठे राज्यकर्ते या देशांतले रहिवासी असल्यामुळें त्यांचें सर्व जातींतील लोकांशीं वर्तन फार चांगलें असे व कोणत्याही जातीला धर्माचे बाबतींत त्यांनीं कधींही त्रास दिला नाहीं. परंतु पूर्वी मुसलमानांचे कारकीर्दींत व पोर्तुगीज राजांचे कारकिर्दींत काय तो थोडा बहुत हिंदुलोकांचा धर्मसंबंधांत छळ झाला असेल तेवढाच. बाकी अकबर वगैरेंचे कारकिर्दींत तर हिंदुलोकांनीं दिवाणगिरीचीं कामें केलेलीं आहेत. मुसलमानांचा हिंदुलोकांवर इतका विश्वास बसण्याला कारण माझे मतें त्याचें सद्धर्माचरणच होय. त्यावेळीं व मराठशाहींत लोकांना सर्व प्रकारचें सुख होतें व तेव्हां त्यांच्यांत जे राजाचे सल्लागार असत ते सर्व सद्धर्माचरणानें वागत असल्यामुळें त्यांच्यावर सर्व लोकांचा व त्या राजांचा विश्वास असे व त्यायोगानें त्यांनीं कोणतीही गोष्ट केली तरी ती लोकांचे अहिताची कधींही होत नसे. हल्लींप्रमाणें त्यावेळचें शिक्षण आपसांत दुही किंवा वितुष्ट पाडणारें नव्हतें. तर पूर्वीचें शिक्षण उत्तम प्रकारचें ह्मणजे धर्म नीति व आचार यांना धरून असे. ही पूर्वींच्या राज्यकर्त्यांची व त्या वेळच्या त्यांच्या प्रजेची स्थिति झाली. परंतु हल्लींच्या इंग्रजी राज्यांतील आमचे लोकांची याचे विरुद्ध स्थिति आहे असें दिसतें ( चि. ४७ ते ५३ ). इंग्रजी राज्याचा हिंदुस्थानांत अंमल सुरू झाला त्या वेळीं त्यांनें शिक्षण, त्यांचे रीत रिवाज

वगैरेचें अनुकरण करण्यांत (चि. ११०-११९) बंगाली लोकांचा नंबर पाहिला आहे. व त्यांचे संबंधानें सर्वांना माहिती आहे. कांहीं बंगाली लोकांचे एकंदर आचार--विचार वगैरेकडे पाहिलें असतां हे प्रत्यक्ष इंग्लिशांचे सख्खे भाऊच आहेत कीं काय असें वाटतें. तेव्हां दुसऱ्याचें सर्व बाबतींत हुबेहुब आचरण केल्यानें सर्वस्वाचा कसा नाश होतो व ते इंग्लिश राज्यकर्ते अशा दुसऱ्या धर्माचें आचरण करणाऱ्या लोकांची किती किंमत करतात ह्याचीं नेहमीं उदाहरणें लोकांचे दृष्टोत्पत्तीस येत आहेत. याचें अगदीं अलीकडील ताजें उदाहरण ह्मणजे बंगभंग होय. हा बंगभंग रद्द करविण्यासंबंधानें बंगाली लोकानीं हवी तेवढी शिकस्त केली, परंतु तो रद्द न होतां तसाच कायम राहिला व त्याला मुख्य कारण स्वधर्माचरणाचा अभाव व राज्यकर्त्यांचा त्यांचेवरील अविश्वास हेंच होय असें मला वाटतें ही बंगाली लोकांची स्थिति आहे व याच बंगाली लोकांचें अनुकरण महाराष्ट्रांतील शहाण्या पुढाऱ्यांनीं केलें आहे. परधर्माचें अनुकरण केल्यानें आमचें किती नुकसान झालें आहे व त्यामुळें राज्यकर्त्यांचा आमचे पुढाऱ्यांवर कितपत विश्वास आहे व त्यांच्या मागण्या ते कितपत मानतात हें उघड दिसत आहे. ज्या शिक्षणाला आमचे लोक भुलले त्याच शिक्षणाचे परिणाम आह्माला किती दुःसह झाले आहेत ह्याबद्दल मागें दाखविलेंच आहे. ज्या शिक्षणानें एकमेकांत प्रेमभाव उत्पन्न व्हावा व एकमेकांनीं एक विचारानें वागावें अशा प्रकारचें हल्लींचे शिक्षण मुळींच नाहीं असें ह्मणावें लागतें. येथील म्युनिसिपालिटी ह्मणजे स्थानिक स्वराज्य होय व हें इंग्रजी राज्याचें फळ होय असें लोक समजतात. या म्युनिसिपालिटींत येथील चांगले विद्वान् पुढारी आहेत व त्यांत कोणी अध्यक्ष, सभासद वगैरे आहेत. परंतु या आमचेच शहाण्या लोकांत एकमेकांसंबंधानें चढाओढ लागून अमक्याचा मी केव्हां पाडाव करीन व मी त्याचे जागेवर केव्हां येईन अशा प्रकारच्या त्यांच्या खटपटी असतात व याचें अलीकडील ताजें उदाहरण ह्मटलें ह्मणजे गेली म्युनिसिपालिटींतील सभासदांची व लेजिस्लेटिव कौन्सील वगैरेची निवडणुक होय. या निवडणुकींत कांहीं सरकारी अधिकाऱ्यांनींही बरीच ढवळाढवळ केली असल्याचें समजतें. व थोडे दिवसांनीं ही म्युनिसिपालिटी सरकारचे ताब्यांत जाणारसें दिसतें. ही कशानें तर आमच्यांतील एकमेकांसंबंधानें चढाओढीमुळेंच असें मला वा

१९२०२



टतें. ज्यावेळीं मुंबई शहरांत विहार व तुळशी हे दोन तलाव होते त्या-वेळीं येथील लोकांना पाण्यासंबंधानें कधीं अडचण पडल्याचें ऐकिवांत नाहीं. व त्यावेळीं प्रत्येक घराला इंच दीड इंचांची पाण्याची तोटी मिळत असे. याचें कारण अनुभवी व समंजस कमिशनर्स. त्याच म्युनिसिपालिटीचे हल्लींचे कारकिर्दींत तान्सा तलावासारखा मोठा तलाव मुंबई शहराला मिळाला असतां येथील घरवाल्यांचे ५-६ मजली घरांना अर्धा किंवा पाऊण इंचाची पाण्याची तोटी मिळावी व त्यामुळें लोकांची पाण्यासंबंधानें गैरसोय व्हावी यासारखी दुसरी शोचनीय स्थिति कोणती? व ह्यालाही कारण आमचे म्युनिसिपालिटीतील लोकच ( कार्पोरेशनचे मेंबर ) होत यांत संशय नाहीं.

समाजधुरीण अर्थात् पुढारी विद्वान लोकांत परस्पराविषयीं द्वेष, मत्सर; राज्यकर्त्यांचा गैरविश्वास, व त्यामुळें प्रजाजनांची होत असलेली वाईट स्थिति, एवढ्याला मुख्यत्वें करून कारण ह्मटलें ह्मणजे स्वधर्मा-चरणानें हे पुढारी व हल्लींची कांहीं प्रजा वागत नाहीं हेंच आहे असें मागें सांगितलेंच आहे हल्लींच्या दयाळू इंग्रजसरकारच्या राज्यांत पूर्वींचे मुसलमान, पोर्तुगीज वगैरे राज्यकर्त्यांप्रमाणें धर्माचे बाबतींत कोणावर जुलुम होत नाहीं, एवढेंच नाहीं तर दयाळू कै. महाराणी विक्टोरिया यांनीं आपल्या १८५७ सालच्या जाहिरनाम्यांत आपण कोणाचेही धर्मबाबतींत मुळींच हात घालणार नाहीं अशा अर्थाचें एक वाक्य घातलें आहे व त्याप्रमाणें हल्लींचे राज्यकर्ते वागत आहेत. पूर्वींप्रमाणें लोकांवर जुलुम करून त्यांना आपले धर्मांत घेण्याचा अर्थात् बाटविण्याचा हल्लींच्या राज्यांत कोठेंही प्रजाजनांवर जुलुम होत नाहीं. अशी हल्लींच्या दयाळु इंग्रजसरकारच्या राज्यांत स्थिति असतां येथील प्रजा व विशेषत: हिंदुप्रजा आपले धर्मानें न वागतां परधर्माचरण आपण होऊन करीत आहे हें खरोखर आश्चर्यच ह्मटलें पाहिजे. स्वधर्माप्रमाणें वागण्यांत हल्लींच्या राज्यांत जितकें सुख व सवलती आहेत, तितकें सुख व सवलती पूर्वींच्या राज्यांत खास नव्हत्या; व यदाकदाचित् सवलती असल्या, तरी निदान शांतता तरी नव्हती. अशा काळांत देखील शेंकडा नव्वद लोक स्वधर्मानें वागत होते, परंतु हल्लींच्या शांततेच्या काळांत शेंकडा २५ही स्वधर्मानें वागणारे नाहींत. कारण आमचे पुढारी व विद्वान् ह्मणविणारेच जर स्वधर्मानें वागत नाहींत, तर त्यांचेंच सर्वस्वीं अनुकरण करणारे अज्ञान असे लोक तरी चांगले रीतीनें कसे वागणार? अर्थात् तेही पुढाऱ्यां-

प्रमाणेंच वागणार. आमच्या धर्माच्या कांहीं बाबतींत याच शहाण्या लोकांनीं दयाळू सरकारचा हात शिरकवला आहे. इंग्रजी-राज्यकर्ते सार्वभौम आहेत व गायकवाड, शिंदे, होळकर वगैरे संस्थानिक त्यांचे मांडलिक आहेत. आमच्या धर्माचें व गोब्राह्मणांचें पालन या आमच्या संस्थानिकांनीं करायचें, परंतु त्यांचेच झोरके व शहाणे गणलेले सयाजीराव हेच अगोदर एकसारखे विलायतचे यात्रेला जात असतात व त्यांचेंच अनुकरण इतरही संस्थानिक करतात; तेव्हां यांचेच जर स्वधर्माप्रमाणें आचरण होत नाहीं तर त्यांचे प्रजेचे हातून स्वधर्माचरण तरी कोठून होणार ? कारण " यथा राजा तथा प्रजा. " ज्या आपले ह्मटलेल्या संस्थानिकांनीं त्यांचे हद्दीतील धर्मगुरू जे शंकराचार्य यांची सर्व प्रकारें योग्य व्यवस्था ठेवून त्यांचेकडून सर्व प्रजेला स्वधर्मरत करावयाचें, तेच संस्थानिक आपल्या पूर्वजांनीं त्यांना दिलेलीं इनामें व जहागिऱ्या जप्त करीत आहेत, व त्यांना विचारीनासे झाले आहेत, ह्मणूनच जगद्गुरूचे हल्लीं कोणीही ऐकत नाहीसे झाले आहेत. हेच संस्थानिक जर आपले पूर्वजांच्या आज्ञा वगैरे मानीत नाहींत तर हाच त्यांचा कित्ता सार्वभौम दयाळू इंग्रज सरकारनें त्यांचे बाबतींत ही वळवला तर त्याला आह्मीं नांवें कां ठेवावीं ? तेव्हां हेच आमचे संस्थानिक इंग्रज सरकारला आपले कृतीनें असें वागण्याला शिकवीत आहेत असें ह्मणण्याला कांहीं हरकत नाहीं

याप्रमाणें धर्माबाबतींत व एकंदर बाबतींत आमचे संस्थानिकांची व प्रजेची विशेषत: हिंदु प्रजेची वाईट स्थिति झाली आहे. याकरतां आमचे स्वधर्मानें वागणाऱ्या लोकांनीं आपल्यांतलेच चांगले पुढारी निवडावे व त्या पुढाऱ्यांनीं आमचे दयाळू सरकाराचे कौन्सिलांत आमचे धर्मशास्त्री वगैरेस धरून जसें पूर्वी मंडलिक वगैरे वागत असत त्याप्रमाणें त्यांचेकडून व्यवस्था राहील अशी तजवीज करावी तसेंच या लोकांनीं एक स्वतंत्र मोठी सभा भरवुन सर्व लोकांनीं धर्माचे बाबतींत जगद्गुरूचे आज्ञेप्रमाणें चालावें अशाबद्दल व्यवस्था करावी. मात्र ते जगद्गुरु आदि आचार्यांचे परंपरे प्रमाणें चालणारे असतील किंवा चालतील तरच त्यांस मानावें. नाहींपेक्षां त्या गादीवर सर्वानुमतें सुशील सद्गुणसंपन्न, निस्पृह, निर्लोभी व विद्वान् अशी व्यक्ति गादीवर बसवुन धर्मपरंपरा कायम ठेवावी व याजबद्दल दयाळु इंग्रज सरकाराजवळ अशी विनंति करावी कीं धर्माचे बाबतींत आमचे जगद्गुरू आचार्य

जी व्यवस्था करतील तींत केव्हांही सरकारनें हात घालूं नये अशाबद्दल व्यवस्था करावी. आतां सर्व वाचकवर्गास माझी अशी विनंती आहे कीं आपण ज्याचे मुलगे, नातू पणतू असे ह्मणवितों व त्यांचे पश्चात् त्यांनीं मानलेल्या धर्माप्रमाणें इस्टेटीचे वारशाचा हक्क घेतों, तर त्यांचे धर्म व रूढीप्रमाणें वागणें हें आपलें कर्तव्य असून त्यास आह्मीं बहुतेक अंशीं पराङ्मुख झाल्यामुळें आह्मांस व आमचे देशास हल्लींची ही वाईट स्थिति प्राप्त झाली आहे. तर ती जाऊन आपला व आपले देशाचा अभ्युदय व्हावा अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं हें पुस्तक वाचून वडिलार्जित धर्म व रूढीप्रमाणें वागण्यास सुरवात करावी एवढें वाचकांस सांगून त्यांची रजा घेतों.

## चित्रांचा तपशील.

चि. नं. १-२ ब्रह्म व माया. चि. नं ३-४-५-६- अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शूद्र. चि. नं ७-८-९ हीं जोडपीं ( दंपत्यें ) आहेत यांचा खुलासा केलेला आहे. चि. नं. १०।११।१२।१३।१४।१५।१६।१७ ही पण संतती व बिनसंतती दर्शक चित्रें आहेत. याचें कारण कीं आलिकडील मंडळींचे तत्वा प्रमाणें नुस्ते स्त्री आणि पुरुष यांचें संयोगापासून संतती होते, तर तसें नाहीं. जन्मास येणाराचें कर्म व ईश इच्छा या योगानें ब्राह्मणांत किंवा इतरांत जन्म होतो जसें चि. नं. हळद ( १३९ ) व चुना (१४०) एके ठिकाणीं केला असतां रंग बदलतो तसा स्त्री आणि पुरुषांचा संयोग होतांच संतती होत नाहीं. चि. नं १८ भिक्षुक. चि. नं. १९ गृहस्थ. चि. नं. २० भिक्षुक. चि. नं २१ गृहस्थ. चि. नं. २२ रंडगोळक. चि. नं. २३ मुंडगोळक. चि. नं. २४ विदूर. चि नं.२५ क्षत्रिय. क्षात्रधर्मानें वागणारा. चि. नं.२६ क्षत्रीय मुत्सद्दी. चि. नं २७ खर्चीक्षत्रिय. चि. नं.२८ वैश्य. व्यापारकर. चि. नं२९ वैश्य फेरी क. चि.नं ३० शूद्र घिसाडी. चि. नं ३१ लोहार. चि. नं ३२ सुतार. चि. नं. ३३ न्हावी. चि. नं. ३४ धोबी. चि नं ३५ महार. चि नं ३६ चांभार. चि. नं. ३७ भंगी. चि नं. ३८ ब्राह्मण. चि. नं. ३९ क्षत्रिय. चि. नं ४० वैश्य. चि. नं. ४१ शूद्र. चि. नं. ४२ ब्राह्मण-सिंपी. चि. नं. ४३ ब्राह्मण-धोबी. चि. नं ४४ ब्रा. कारकून. चि. नं. ४५ शास्त्री. चि. नं. ४६ पंडित. चि. नं. ४७ ब्रा. विद्वान पुढारी सुधारक प्रा. स. व विधवा विवाहाचे अध्वर्यु. चि. नं ४८ आलिकडील विद्वान व सब तऱ्हेनें धर्मांतर करून पश्चाताप पावलेले पुढारी. चि. नं. ४९ सर्व जाती एक असाव्या व देशाची कळकळ नांवानें बाळगणारे पुढारी. चि. नं. ५० प्रार्थना समाजाचे सब गोलंकारांचे व विद्वानांचे अधिकाराचे अध्वर्यु. चि. नं. ५१ प्रथम धर्म न मानतां पुन्हां तो मानणारे विद्वान. चि. नं. ५२ विधवा विवाहाचे अभिमानी व सब गोलंकाराबद्दल छुः करणारे—चि. नं. ५३ सब गोलंकार व बायकांच्या मुंजी करा ह्मणणारे वगैरे. चि. नं. ५४ क्षत्रिय. तरवारबहादर. चि. नं. ५५ क्षत्रिय. वैश्याचा धंदा क. चि. नं ५६ वैश्य. वाण्याचा धंदा. चि. नं. ५७ वै. नोकरी. चि. नं. ५८ सावकार. चि. नं.५९ शुद्र शेतकाम क. चि. नं. ६० शुद्र. पोथीवाचतो. चि. नं. ६१ शू. गवतवाला. चि.नं. ६२ शू. मजूरी. चि. नं ६३ शू. सिपाई. चि. नं. ६४ शू. सरदार. चि. नं.६५ शू. गुरासी. चि. नं.६६ शू. रामोशी. चि. नं.६७ शू. मांग. चि. नं.६८

माहार झाडु. चि. नं. ६९ शूद्र-विद्वान. चि. नं ७० राजा. चि. नं. ७१ मोरचलवाला. चि. नं. ७२ चवरीवाला. चि. नं. ७३ सेनापती. चि. नं. ७४ पायदळावरचा अधिकारी. चि. नं. ७५ पागेवरचा अधिकारी. चि. नं. ७६ दुसरे पायदळावरचा अधिकारी. चि. नं ७७ तिसरे पा. अधिकारी. चि. नं. ७८।७९।८०।८१।८२।८३।८४।८५।८६।८७।८८। ८९।९० प्रत्येकी १०० मनुष्यांचे तुकडीचा अधिकारी. चि. नं. ९१।९२।९३ ९४।९५।९६ प्रत्येकीं ५१ घोड्यास्वारावरील अधिकारी. ९७।९८।९९।१०० हे प्रत्येकी तोफखान्यावरील अधिकारी. चि.नं१०१-१०२।१०३।१०४ हे प्रत्येकीं १०० सीपायावरील अधिकारी. चि.१०५।१०६।१०७।१०८।१०९हे प्रत्येकी१००पायदळावरील अधिकारी. अशी ही एकंदर नंबर ७०-ते १०९ पर्यंत जीं चित्रें दाखविलीं आहेत याचा हेतू इतकाच आहे कीं आमचें चित्र नंबर ४७ते५२ व११०ते११६ च आमचे हिंदुस्थांनांतील अलिकडील विद्वान व पुढारी असे या लोकांची जी एकीची(युनिटीची) तत्वें तीपासून एकी तर होणें राहिलीच परंतु उलट दसकी मात्र झाली आहे हें प्रत्यक्ष दिसतच आहे. आतां राजा नं.७० चा एक व सेनापती नं. ७३ चा एक व ७४।७७ पर्यंतचे अधिकारी एकेक यांचें हाताखालीं किती तरी जातींचे व किती तरी लोक आहेत? परंतु अगदीं खालचें ८ रुपायाचे सिपायानी जर असें ह्मटलें कीं राजांत व माझे परंपरेचे अधिकारी वर्गाचे अवयवांत व माझ्या अवयवांत कांहीं फरक नाहीं. असे असतां ह्यांस आह्मीं राजा ह्मणून काय ह्मणून मानावें व या गुलामांनीं आमचे जिवावर खुशालचैन मारावी असें जर तो ह्मणेल तर ह्या जगांत जगताची प्रवृत्ती चालणारच नांहीं व या राजानें किंवा याचें वरील अधिकारी वर्गानीं पण आपण व हें अवयवांनीं सारखेच आहोंत तेव्हां यांचें व आमचें धर्माचे वर्तनांत भेद कां असावा असे जर ते ह्मणतील तर तेहि त्यांचें ह्मणणें चुकीचें होऊन त्या उभयतांत वैमनस्य वाढेल. हें तत्व जाणूनच आजपर्यंतचें आमचे राजे लोक व अधिकारी वर्ग हे प्रत्येकाचे धर्माचे आड येत नाहींत. फक्त आपले लष्करचे कामांत मात्र त्यांस साम्यतेनें वागावें लागतें व ते सर्व खुषीने एकमेकांशीं सलोख्यानें वागतात मात्र काम आटोपल्याबरोबर जो तो खाण्यापिण्यां संबंधानें आपआपले धर्माप्रमाणे व्यवस्था ठेवतो व राजा व वरिष्ठ आधिकारी वर्गही पण त्यांस व्यत्यय करीत नाहींत. ह्मणूनच यांची एकी असते व त्याची सर्व कामें यथास्थित पार पडतात. यावरून आमचे वरील पुढारी मंडळीचें योगानें आमचे समाजांत चुथडे माजून तोच ब्राह्मण मोठा काय ह्मणून वगैरे बद्दल वाद आहेत. चि. नं ११० तें ११६ आमचे बंगालचे विद्वान् पुढारी. चि. नं. ११७ खाणावळीची मालकीण. चि. नं. ११८ वाढपी. चि. नं. ११९ ते १२६ जेवणारे ब्राह्मण. चि. नं १२७ ते १३० जेवणारे सुतार, सोनार वगैरे ब्राह्मणेतर. चि. नं. १३१ ब्राह्मणाचे उपाहारगृहाचा मालक. चि. नं. १३२ डब्यांतून लिमजी काढीत असलेला ब्राह्मण. चि. नं.१३३राउंड टेबलावर चहा पीत असलेला शूद्र. चि. नं१३४ त्याच टेबलावर चहा पीत असलेला ब्राह्मण. चि. नं १३५ त्याच टेबलावर चहा पीत असलेला घडची. चि. नं १३६ चहा पिणारा हमाल. चि. नं. १३७ सूर्य. चि. नं. १३८ चंद्र. चि. नं. १३९ हळद. चि. नं.१४० चुना. चि. नं.१४१ पाणक्याचा मुलगा. चि. नं. १४२ पाणक्या भट. चि. नं १४३ आमच्या देशांतील पोषाकाची जुनी पद्धत. चि. नं. १४४ अलीकडील नवीन साहेबी पोषाखाची पद्धत. चि. नं.१४५ आमच्या जुन्या कुलशील स्त्रियांची जुनी पद्धत. चि. नं. १४६ हल्लींची कुलीन स्त्रियांची नवीन पद्धत. चि. नं. १४७ वेश्यांची रहाणीची पद्धत.

# मराठी पुस्तकें.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी. चित्रांसहीत. चिपळूणकर कृत. | ४ | ० | ० |
| ह. कृ. दामलेकृत सचित्र इसापनीति. | ० | १० | ० |
| ,, हिंदुस्थानांतील योध्यांच्या थोरवीच्या गोष्टी. | १ | ४ | ० |
| ना. ल. फडकेकृत राणीचे राज्याचा इतिहास | २ | ० | ० |
| का. बा. मराठेकृत रसायनशास्त्र. | ० | १२ | ० |
| गाडगीळकृत कर्तव्यसुख अथवा संसारसुख. | १ | ८ | ० |
| संगित शाकुंतल नाटक ब. पां. किर्लोस्कर कृत | ० | १२ | ० |
| ,, सौभद्र नाटक ,, ,, | ० | १२ | ० |
| ,, श्रीरामराज्य वियोग नाटक अंक १—५ | १ | ० | ० |
| ,, मृच्छकटीक नाटक गो. ब. देवलकृत | ० | १२ | ० |
| ,, शारदा नाटक ,, ,, | १ | ० | ० |
| नवीन बहारदानीष अथवा बहराम जोहरा कादंबरी. हरी कृष्ण दामले कृत. | १ | ४ | ० |
| रागविलास—डाक्टर अनंत संतराम मालवेकृत. | १ | ८ | ० |
| सटीक दक्षिणेतील शेतकऱ्यास मदत करण्या विषयीं अॅक्ट व त्यासंबंधीं सरकारानें केलेले नियम कानू. स. कृ. फडके कृत. | १ | ८ | ० |
| ह. वि. साठे यांचा ल्यांड रेव्हेन्युकोड अगर जमीन महासुलाचा कायदा. (त्याखालीं झालेल्या सुधारलेल्या कानूसह) | २ | १२ | ० |

हीं पुस्तकें मिसेस राधाबाई आत्माराम सगूण,

बूकसेलर काळ्बादेवीरोड मुंबई यांचेकडे मिळतील

# २० वर्षें सतत चाललेलें सचोटीचें

# मोठें छत्र्यांचें दुकान.

आलीकडे सर्व जातीच्या वॉटरप्रुफ छत्र्या मुंबईत तयार होत आहेत. परंतु एका जातीचा माल निघत नाहीं. प्रत्येक व्यापारी स्वस्त किंमतीने विकण्यात यावे या हेतुने हलका माल वापरतात. त्यामुळें हलका माल निघत असतो. ह्मणून आह्मीं इंग्लंडाहून प्रख्यात छत्र्या बनविणाऱ्या कडून स्पेशल ऑरडर देऊन छत्र्या तयार करण्यास लागणारें सर्व सामान मागवून आमच्या स्वतःच्या कारखान्यांत आमच्या देखरेखी खालीं सर्व जातीच्या वाटरप्रुफ छत्र्या तयार करवून मुंबईमध्यें सर्व दुकानदारांस तसेच बाहेरगावचे सर्व व्यापारी दुकानदारानां फारच कीफायत भावानीं सर्व छापाच्या छत्र्या वापरण्यांत फार मजबूत आणि टीकाऊ अशा देतों. एक वेळ विकत घेऊन खात्री करून घ्या. या शिवाय विलायती इमीटेशन सिल्कच्या नावाजलेल्या जातीच्या चापाच्या व साध्या फेन्सी हेन्डलच्या मुठीच्या फारच कीफायत भावाने घाऊक घेणारास मिळतील. जपानी चांपाच्या लहान मोठ्या साइझच्या छत्र्या पण आमच्या एथे मिळतील व वाटरप्रुफ विलायती तयार मिळतील.

रामचंद्र नामदेव

पायधुणी मुंबई.

कार्ड साइज ४।×३।

फोटो काढण्याचा

# छुपा कॅमेरा.

नं. १८२०२



किंमत अवघे रुपये ३ तीन.

वाटेल त्या मनुष्याचा फोटो, पाहिजे त्या इसमास, ज्याचा फोटो घेण्याची इच्छा असेल त्यास समजूं न देतां, या कॅमेऱ्यानें काढतां येतो. सपाट्यानें धावणारी गाडी, उडतांपक्षी वगैरेंचे फोटो सहज काढतां येतात. यांत शिकण्याजोगें कांहींच नाहीं. ह्या कॅमेरेची माहिती खरेदीदारांस आह्मी घर बसल्या करून देऊं. पुष्कळ ठिकाणीं ह्यास रु. १० ते १५ किंमत पडते. परंतु ह्यांची खरी किंमत पोष्टेज शिवाय रुपये ३ आहे.

**छोटालाल छगनलाल महाजन,**

ठाकोरद्वार—मुंबई.

भक्ति पोषण.

पद्यात्मक मराठींत भाषांतर.

भगवत्भक्ति कशी वाढते तें दाखविणारा मार्ग.

गोलोकवासी भा. मा. पंडित श्री गट्टुलालजी धर्म पुस्तकालयांत मिळेल.

मुलेश्वर—मुंबई.